। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २४० वा । शनिवार दिनांक ०६ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## जिल्ह्यातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करा -परिवहन आयुक्त विवेक भिमनवार

### रस्ते अपघाताचा घेतला आढावा




धाराशिव (जिमाका) दि.०५ डिसेंबर : जिल्ह्यात रस्ते अपघाताचे प्रमाण इतर जिल्ह्याच्या तुलनेत जास्त आहे. जिल्ह्यातील रस्ता अपघाताची सखोल कारणे शोधली पाहिजे.वाहन चालकांमध्ये व्यापक प्रमाणात जनजागृती करणे गरजेचे असून जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.असे निर्देश राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी दिले.

४ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यातील रस्ते अपघाताचा आढावा घेताना आयोजित सभेत श्री.भिमनवर बोलत होते. जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक श्रीमती. रितू खोखर,प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर,उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके,सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शिवराम केत व एस.एस.मस्के,राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक स्वप्निल कासार व महेश पाटील,राष्ट्रीय महामार्ग उपप्रबंधक अमित पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री.भिमनवार म्हणाले की,सन २०२४ आणि सन २०२५ मध्ये जिल्ह्यात घडलेल्या रस्ते अपघाताचे विश्लेषण करावे.गोल्डन अवरमध्ये अपघातग्रस्तांना तातडीने सेवा उपलब्ध झाली पाहिजे.रुग्णवाहिका ही कमीत कमी वेळेत अपघातग्रस्त ठिकाणी पोहोचून तातडीने अपघातग्रस्तांना दवाखान्यात घेऊन जाताच तातडीने उपचार मिळाले पाहिजे.जिल्ह्यातील अपघात प्रवण ठिकाणे कोणती आहेत हे निश्चित करून त्या ठिकाणी भविष्यात अपघात होणार नाही,यादृष्टीने उपाययोजना कराव्यात.मद्यप्राशन करून वाहन चालवून अपघात होण्याचे प्रमाण हे जास्त आहे. पहाटे ४ ते सकाळी ८ या चार तासाच्या कालावधीत रस्ता अपघाताचे प्रमाण जास्त आहे.हे प्रमाण कमी करण्यासाठी परिवहन विभाग व पोलीस विभाग यांनी संयुक्तपणे सलग सहा महिने यावर फोकस करून काम करावे.असे श्री.भिमनवार यांनी सांगितले.

दुचाकीस्वारांना हेल्मेटचा वापर करण्यास प्रवृत्त करावे असे सांगून श्री.भिमनवार म्हणाले की,जिल्ह्यात ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना रिफ्लेक्टर लावणे बंधनकारक करावे तसेच दुचाकी वाहनांना देखील रिफ्लेक्टर लावावे.त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होईल.रस्त्याचे व पुलाचे जिथे काम सुरू आहे,त्या ठिकाणी रिफ्लेक्टर व बॅरिकेट्स लावण्यात यावे तसेच काम सुरू असलेल्या ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात यावे.त्यामुळे कामाच्या ठिकाणी होणारे अपघात टाळता येतील.रस्ता सुरक्षेसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करून घ्यावा. निधीची आणखी आवश्यकता पडल्यास परिवहन विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येईल.रस्ते अपघात होण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालविणे हे आहे.पुढील दोन तीन महिन्यात मॉनिटरिंग करून रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करावे असे ते म्हणाले.

जिल्ह्यातील रस्ता अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्ता सुरक्षा बैठकीत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक ते निर्देश देण्यात येतील तसेच रस्ता सुरक्षेबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येईल.रस्ता सुरक्षेसाठी जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे जिल्हाधिकारी श्री.पूजार यांनी यावेळी सांगितले.

श्रीमती खोखर यावेळी म्हणाल्या की, जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलीस व परिवहन विभाग आवश्यक त्या उपाययोजना करत आहे. नियम मोडणाऱ्या वाहन चालकाविरुद्ध दंड वसूल करून योग्य ती कारवाई करण्यात येईल.असे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.चव्हाण म्हणाले की,जिल्ह्यात जानेवारी २०२५ ते आतापर्यंत झालेल्या रस्त्या अपघाताची नोंद घेऊन रस्ता अपघाताची कारणे शोधली आहेत.रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी परिवहन विभागाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील असे त्यांनी सांगितले.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.डाके यांनी जिल्ह्यात रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या ३ जुलै,२ सप्टेंबर आणि २५ नोव्हेंबर २०२५ रोजी बैठका झाल्या. खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली २७ जानेवारी २०२५ रोजी संसद सदस्य सडक सुरक्षा समितीची बैठक झाली.एप्रिल २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत रस्ता सुरक्षाविषयी घडलेल्या विविध ९ प्रकारच्या गुन्ह्यात ५५७४ प्रकरणात गुन्हे दाखल करून दंड वसूल करण्यात आला. रस्ते अपघातात मृत्यू पडणाऱ्या पादचाऱ्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्त्याच्या उजव्या बाजूने चला याचे महत्त्व पटवून दिले जात आहे.जिल्ह्यात रस्ता अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यामध्ये दुचाकी स्वाराचे प्रमाण अधिक आहे.हे प्रमाण कमी करण्यासाठी वाहन चालकांचे प्रबोधन व त्याची अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत असल्याचे श्री.डाके यांनी सांगितले.जिल्ह्यात ऑक्टोबर २०२४ मध्ये २७ अपघातात २९ जणांचा मृत्यू झाला तर ऑक्टोबर २०२५ मध्ये ४० अपघातात ४८ जणांच्या मृत्यू झाला. सन २०२४ मध्ये ऑक्टोबर २०२४ पर्यंत २२७ रस्ते अपघातात २५० व्यक्तींचा आणि सन २०२५ मध्ये ऑक्टोबर २०२५ पर्यंत ३०२ रस्ते अपघातात ३२८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती श्री.डाके यांनी यावेळी दिली.

या सभेला परिवहन,पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अन्य संबंधित अधिकारी देखील उपस्थित होते. आभार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.डाके यांनी मानले.

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

तामलवाडी(प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत रमेश रा. गंजेवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव हमु. तामलवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०४.१२.२०२५ रोजी .गंजेवाडी येथील राहते घरा मध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ डॉयरेक्टर पान मसाला, प्रिमीयम टोबॅको, विमल पान मसाला, व्ही १ तंबाखुचे असा एकुण एकुण ९७,१४० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला तामलवाडी पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- १२३, २२३,२७४, २७५ सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम २६ (२)(ळ)२६(२)(ळत),२७ (३)(९),३०(२) अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ऑक्सीजन वॉल सह ३,१९,००० किंमतीचे साहित्याची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सारीका भाउसाहेब बेलुरे, वय ४० वर्षे, रा. शिवाजी नगर सांजा बायपास रोड धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे ऑक्सीजन वॉल ३५ नग, कॉपर झिंक फ्लेक्झीबल नोजल बोल्ट, ईनरशेट ४० नग, आरटींग कॉपर पट्टी, पाईप १३ मीटर पाईप, असा एकुण ३,१९,००० किंमतीचे साहित्य हे दि.२६.११.२०२५ रोजी ०९.०० ते दि.०१.१२.२०२५ रोजी ०६.०० ते २१.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सारीका बेलुरे यांनी दि.०४.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### डिसी केबल, जंक्शनबॉक्स, कनेक्टर, आर्थिंग केबल सह १६,८५,५००₹ची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मच्छिंद्र , जालींदर हे, दोघ रा. कन्हेरी ता. वाशी जि. धाराशिव, बाबुषा रा. दसमेगाव ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.१७.११.२०२५ रोजी वाशी शिवारातील सर्वे नं ६९९ (क) (ब), ७०० (क)(ब), व ७०३ (ड) मधील जयसाई कन्ट्रक्शन प्लॉटवरुन१९ हजर मिटर डि सी केबल, जंक्शन बॉक्स१८६ नग, वाय कनेक्टर ३०० नग, एम सी फोर कनेक्टर ४८० नग, ५० मिटर आर्थींग केबल, बुश क्राईल असा एकुण १६,८५,५०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे-संतोष मेसाजी कारलेकर, वय ५० वर्षे, व्यवसाय मॅनेजर जयसाई कन्ट्रक्शन रा. दत्त नगर ढोकी ता. जि. धाराशिव ह.मु. रामनगर धाराशिव यांनी दि.०४.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पदवीधर मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी जाहीर दावे-हरकती १८ डिसेंबरपर्यंत स्वीकारणार

धाराशिव (जिमाका) दि.०५ डिसेंबर : ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणी कार्यक्रमाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली प्रारुप मतदार यादी दिनांक ०३/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.सदर प्रारुप मतदार यादीबाबत काही आक्षेप किंवा त्रुटी असल्यास,दिनांक ०३ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत.

प्रारुप मतदार यादीसंबंधी दावे व हरकती स्वीकारण्यासाठी मतदान केंद्रनिहाय पदनिर्देशित अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यानुसार,आपल्याला काही दावे किंवा हरकती सादर करावयाच्या असल्यास,अर्जाचा विहित नमुना क्रमांक १८,०७ आणि ०८ मध्ये संबंधित मतदान केंद्रावर नियुक्त अधिकाऱ्यांकडे दिनांक १८ डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत सादर कराव्यात.

०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीच्या अनुषंगाने प्रसिध्द केलेल्या प्रारुप मतदार यादीचे अवलोकन करून, दिनांक १८ डिसेंबर २०२५ पर्यंत दावे व हरकती दाखल करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सुधारित आकृतीबंधास शासनाची मंजूरी: नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे यांची माहिती

धाराशिव (जिमाका)- महसूलमंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मंजूरी देणारा शासन निर्णय महसूल व वन विभागामार्फत ४ डिसेंबर २०२५ रोजी काढण्यात आला आहे.सुधारित आकृतीबंधानुसार विभागातील मंजूर पदांची संख्या ३ हजार ९५२ इतकी झाली असल्याची माहिती नोंदणी महानिरीक्षक श्री.रविंद्र बिनवडे यांनी दिली.

अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांच्या प्रयत्नांतून, सध्या मंजूर ३ हजार ९४ पदांपैकी १०७ पदे निरसित करण्यात आली असून ९६५ नवीन पदांची निर्मिती करण्यात आली आहे.महसूल व वन विभागाच्या ४ डिसेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण ३ हजार ९५२ पदांच्या सुधारित आकृतीबंधास अंतिम मान्यता देण्यात आली आहे.


नोंदणी व मुद्रांक विभाग हा राज्य शासनाला महसूल मिळवून देणारा दुसऱ्या क्रमांकाचा महत्त्वाचा महसूल विभाग आहे. विभागाचा नव्या आकृतीबंधाचा प्रस्ताव सन २०१६ पासून प्रलंबित होता.

नवीन दुय्यम निबंधक कार्यालयांची निर्मिती,वाढती दस्त संख्या आणि वाढते कामकाज लक्षात घेता या निर्णयामुळे विभाग अधिक सक्षम व बळकट होणार आहे.

पर्याप्त मनुष्यबळ उपलब्ध झाल्याने शासनाकडून दरवर्षी ठरविलेल्या इष्टांकांच्या पूर्तीत मदत होईल,शासन महसूलात वाढ होईल आणि नागरिकांना अधिक वेगवान व गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा शासनाचा व विभागाचा मानस सफल होण्यास ही मंजूरी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## जेष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांच्या निधनाने समाजकारण व राजकारणात मोठी पोकळी

धाराशिव (प्रतिनिधी)- पाणलोट, एकल महिला, निराधार मुले यांच्यासाठी आयुष्यभर सचोटीने संघर्ष करीत समाजवादी विचारसरणीने निरलस आयुष्य जगणारे जेष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांनी धाराशिव जिल्ह्यात भूकंपग्रस्त भागातील मुलांसाठी बांधलेल्या 'आपलं घर' या संस्थेत अखेरचा श्वास घेतला. सामाजिक कार्यकर्त्यासाठी त्यांची ओळख ही भाऊ या नावानेच होती भाऊंचे जाणे म्हणजे अनेक अर्थाची पोकळी आहे. भाऊंचा प्रवास नेहमी राज्य परिवहन मंडळाच्या बसनेच असायचा. भाऊ निराधार, अनाथ, वंचितासाठी आयुष्यभर झटत राहिले. समाजवादी पक्ष, जनता पक्ष, पुरोगामी संघटना आणि जन आंदोलनालयाच्या घडणीत भाऊंचा मोलाचा वाटा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.) पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण करताना समाजकारण आणि राजकारणातील आदर्श व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेल्याचे म्हटले आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।


# लातूर समाचार

## डॉ. बाबासाहेबांच्या विचाराची गरज

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशात काय जगात ओळखले जाते. त्यानी भारतीय घटना लिहीली. त्यांनी सर्वसमाजासाठी केलेले काम उल्लेखनिय आहे. त्यापेक्षाही दलितासाठी त्यांनी केलेले काम, त्यांना न्याय मिळवुन देणारे आहे. त्यांनी देशातील गोरगरीब, दलितांची व्यथादैनिय आहे. यातून मार्ग काढायाचा झाला तर एकमेव शिक्षण हाच मार्ग आहे हे ओळखले. त्यांनी सर्वसमाजासाठी सक्तीचे शिक्षण आवश्यक आहे. त्यामुळे शिका, संघटीत व्हाव व संघर्ष करा असा सल्ला दिला. शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे जो पिईल तो गुरगुरायला लागेल. असे जाहिर मत व्यक्त केले ते चुकीचे नाही तर योग्य आहे. त्यांनी देशातील परिस्थिती ओळखली, त्यानुसार काम केले. सर्व नागरिक मोठ्या आदराने त्यांचे नाव घेतात. त्यांनी गोरगरीब, दलित व मागासवर्गासाठी शिक्षण घेता यावे म्हणून आरक्षण सुविधा दिली. जगात दलितांचे कैवारी एकमेव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत हे मान्यच केले पाहिजे. डॉ.आंबेडकर यांनी शालेय शिक्षण सातारा येथे घेतले. तेव्हाच दुर्दैवाने डॉ.आंबेडकरांनी त्यांची आई गमावली आणि त्यांच्या आत्याने त्यांचे संगोपन केले. त्यांनतर ते मुंबईला राहायला आले. शालेय शिक्षणादरम्यान त्यांना अस्पृश्यतेचा अभिशाप सहन करावा लागला. डॉ.आंबेडकरांनी एल्फिन्स्टन कॉलेज, बॉम्बे येथे पदवीचे शिक्षण पूर्ण केले, ज्यासाठी त्यांना बडोदा संस्थानचे सयाजीराव गायकवाड यांच्याकडून शिष्यवृत्ती मिळत होती. पदवी संपादन केल्यानंतर त्यांना करारानुसार बडोदा संस्थानमध्ये जावे लागले. बडोद्यात असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. १९१३ या वर्षात डॉ. आंबेडकरांची उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाण्यासाठी विद्वान म्हणून निवड झाली हा त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीचा निर्णायक टप्पा होता. त्यांनी कोलंबिया विद्यापीठातून १९१५ आणि १९१६ मध्ये अनुक्रमे एम.ए आणि पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते लंडनला रवाना झाले. तेथे त्यांना ग्रेज इन फॉर लॉमध्ये प्रवेश देण्यात आला आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समध्ये डी.एस.सी ची तयारी करण्यासही परवानगी देण्यात आली. पण बडोद्याच्या दिवाणांनी त्यांना भारतात परत बोलावले. त्यांनी जर्मनीतील बॉन विद्यापीठातही काही काळ शिक्षण घेतले. १९१६ मध्ये त्यांनी 'भारतातील जाती - त्यांची व्यवस्था, उत्पत्ती आणि विकास' हा शोध निबंध वाचला. १९१६ मध्ये त्यांनी 'भारताचा राष्ट्रीय लाभांश -एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास' हा प्रबंध लिहिला आणि पीएच.डी. पदवी मिळवली. अस्पृश्यतेच्या कारणास्तव त्यांना दिलेल्या अयोग्य वागणुकीमुळे त्यांना सेवा सोडणे भाग पडले. डॉ. आंबेडकर मुंबईला परतले आणि सिडनहॅम कॉलेजमध्ये राजकीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांचे वाचन चांगले असल्याने ते विद्यार्थ्यांमध्ये खूप लोकप्रिय होते. पण लंडनमध्ये कायदा आणि अर्थशास्त्राचे शिक्षण पुन्हा सुरू करण्यासाठी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. कोल्हापूरच्या महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली. १९२१ मध्ये त्यांनी आपला प्रबंध लिहिला. ब्रिटिश भारतातील इम्पीरियल फायनान्सचे प्रांतीय विकेंद्रीकरण आणि त्यांनी लंडन विद्यापीठातून एम.एस.सी.ची पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी जर्मनीतील बॉन विद्यापीठात काही काळ घालवला. १९२३ मध्ये, त्यांनी डी.एससी. ही पदवी घेण्यासाठी प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजिन अँड सोल्युशन हा प्रबंध सादर केला.आणि त्याचवर्षी म्हणजे १९२३ मध्ये त्यांना वकीलांच्या बारमध्ये बोलावण्यात आले. १९२४ मध्ये इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांनी पीडित- शोषित असलेल्या वर्गाच्या कल्याणासाठी त्यांनी एक संघटना सुरू केली. या संघटनेचे 'प्रेसिडेंट' सर चिमणलाल सेटलवाड होते तर अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते. शिक्षणाचा प्रसार करणे, आर्थिक परिस्थिती सुधारणे आणि निराश वर्गाच्या तक्रारींचे प्रतिनिधित्व करणे ही या संघटनेची तत्कालीन उद्दिष्टे होती. नवीन सुधारणांच्या संदर्भात पीडित- शोषित वर्गाच्या समस्यांमागची कारणे शोधून त्यांचे निराकरण करण्यासाठी,३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरू करण्यात आले. १९२८ मध्ये ते गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, बॉम्बे म्हणजेच मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामध्ये प्राध्यापक झाले आणि १ जून १९३५ रोजी ते त्याच महाविद्यालयाचे प्राचार्य झाले. १९३८ मध्ये राजीनामा देईपर्यंत ते याच पदावर राहिले. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे पीडित- शोषित वर्गाची प्रांतीय परिषद झाली. या परिषदेत त्यांनी एक घोषणा करून हिंदूंना हादरा दिला. मी हिंदू धर्मात जन्मलो पण हिंदू म्हणून मरणार नाही त्यांच्या हजारो अनुयायांनी त्यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला.१९३६ मध्ये त्यांनी 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' महार परिषदेला मार्गदर्शन केले आणि हिंदू धर्माच्या त्यागाचा पुरस्कार केला. भारताच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यामधील त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून, १९५२ मध्ये कोलंबिया विद्यापीठाने, त्यांना LL.D ची पदवी बहाल केली. १९५५ मध्ये त्यांनी थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स हे आपले पुस्तक प्रकाशित केले. १२ जानेवारी १९५३ रोजी उस्मानिया विद्यापीठाने, डॉ.बी.आर. आंबेडकर यांना डॉक्टरेट ही पदवी प्रदान केली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर इथल्या ऐतिहासिक समारंभात त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांचा जीवनाचाइतिहास पाहिल्यावर, त्यांचे मुख्य योगदान आणि त्यांची प्रासंगिकता अभ्यासणे आणि त्याचे विश्लेषण करणे आवश्यक आणि योग्य आहे. एका मतप्रवाहानुसार तीन मुद्दे आजही अधिक महत्त्वाचे आहेत. भारतीय अर्थव्यवस्था आणि भारतीय समाज आजही अनेक आर्थिक, सामाजिक समस्यांना तोंड देत आहे. या समस्या सोडवण्यामध्ये, डॉ. आंबेडकरांचे विचार आणि कृती आपल्यासाठी मार्गदर्शक ठरतील. त्यांचे कार्य प्रत्येकांनी जीवनात उतरविले पाहिजे.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर : समता- न्यायाच्या तत्त्वज्ञानाची परिणती

०६ डिसेंबर हा दिवस केवळ महापरिनिर्वाण दिन,स्मृतिदिन नसून मानवी स्वातंत्र्य, समानता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा पुनर्विचार करणारा तात्त्विक क्षण आहे.



भारतीय दर्शनातील इतर काही दर्शना प्रमाणे बौद्ध दर्शन ही नास्तिक दर्शन आहे. गौतम बुद्ध हे बौद्ध धर्माचे संस्थापक असून जगास शांततेची शिकवण देणाऱ्या महामानव गौतम बुद्ध यांनी मानवी जीवनातील दुःखाची कारणे व दुःख मुक्तीचा उपाय शोधण्यासाठी सर्व सुखाचा त्याग करून कठोर तपश्चर्या, ध्यानधारणा केली. त्यातूनच त्यांना बुद्धत्व प्राप्त झाले जे प्राप्त झाले ते इतरांना सांगण्याचा प्रयत्न केला त्यातीलच चार आर्य सत्य होय. या चार आर्य सत्यातील चौथे आर्यसत्य म्हणजे दुःख नाशाचे मार्ग म्हणजेच आर्यअष्टांगिक मार्ग असून हाच बौद्ध दर्शनाचा नीतिविचार होय. आणि तो विचार बाबासाहेबांनी आपल्या सबंध आयुष्यात अहोरात्र पाळला.

भारतीय राज्यघटेनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आज महापरिनिर्वाण दिन. ०६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण झाले. त्यानंतर त्यांचे पार्थिव मुंबईला राजगृहावर (दादर) येथे आणण्यात आले. शिवाजी पार्क येथील समुद्रकिनारी असलेल्या हिंदू स्मशानभूमीमध्ये ७ डिसेंबर १९५६ रोजी लाखो अनुयांया समक्ष त्यांच्यावर बौद्ध पध्दतीने अंतिम संस्कार करण्यात आले. त्यावेळी हिंदू स्मशानभूमी एवढीच त्या जागेची ओळख होती. काही वर्षांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र अस्थीवर चैत्य उभारण्यात आले. या महामानवास अभिवादन करण्यासाठी सर्व प्रांतातून लाखो लोक या चैतन्यभूमीवर येत असतात.

महापरिनिर्वाण ही संकल्पना बौद्ध परंपरेतील आहे ती केवळ शारीरिक मृत्यु नसून ज्ञान, कृती, आणि मुक्तीच्या अंतिम अवस्थेचे द्योतक आहे. म्हणूनच बौद्ध धर्मातील सर्वात महत्त्वाचे तत्त्व आणि ध्येय म्हणजे निर्वाण होय. निर्वाणाचे उपाधिशेष व निरुपाधिशेष असे दोन प्रकार समजण्यात येतात. निरुपाधिशेष निर्वाणाला परिनिर्वाण असे म्हटले जाते.

सर्वसामान्यपणे निर्वाण म्हणजे सर्व दुःखांचा लोप होणे व दुःखांनी भरलेल्या जीवनाचा, जन्ममरणाचा फेरा पूर्णपणे थांबणे, भोगावयाचे सर्व कर्म संपल्यावर नवे कर्म न साठणे व त्यासाठी पुनर्जन्म न घ्यावा लागणे असा अर्थ लावला जातो. परंतु माध्यमिकांना निर्वाणाचा हा अर्थ मान्य नाही. त्यांच्या मते, निर्वाण म्हणजे सर्व गोष्टी मध्ये आत्मतत्वाचा अभाव होय.

निर्वाणामध्ये सर्व घटना लोप पावतात. निर्वाण हे सर्व दुःख व परिवर्तन यांच्या अतीत आहे ते स्थिर, अक्षय, दोषरहित, शांतरुप व आनंदपूर्ण आहे. ते अंतिम ध्येय आहे तथागताला मृत्यूनंतर प्राप्त होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्वाणाच्या संकल्पनेचे केलेले विश्लेषण व लावलेला अर्थ परंपरेने समजल्या गेलेल्या व सध्या प्रचलित असलेल्या अर्थाहून अगदी भिन्न आहे. त्यांच्या मते, निर्वाण म्हणजे सन्मार्गाने वाटचाल करता येण्यासाठी विकारावर पुरेसे नियंत्रण ठेवावे एवढेच बुद्धाला सुचवायचे आहे.

निर्वाण म्हणजे संपूर्ण विनाश नव्हे तर मध्यम मार्गाचे आचरण करून सदाचरण करणे किंवा सद्धम्माचे पालन करणे होय. क्रोध, दुष्प्रवृत्ती, मत्सर, द्वेष, लोभ, ढोंगीपणा, फसवेगिरी, आळशीपणा हे सर्व वाईट अशुभ आहेत आणि त्यापासून मुक्त होणे म्हणजेच सद्धम्माचे आचरण करणे, निर्वाण होय.

निर्वाण प्राप्तीच्या मार्गात बुद्धांची भूमिका इतरांच्या भूमिकेपेक्षा वेगळी आहे. मला शरण या मग मी तुम्हाला मोक्ष देईन. असे बुद्ध म्हणत नाहीत. त्यांच्या मते, स्वःप्रयत्नाने निर्वाण प्राप्त केले पाहिजे. डॉ. बाबासाहेबांनी ते प्राप्त केले. त्यांच्या मते, बुद्ध फक्त मार्गदाते आहेत, मोक्षदाते नाहीत. विचार करणाऱ्या सत्यशोधन करणाऱ्या व प्रयत्न करणाऱ्या माणसांनी भरलेला समाज बुद्धांना निर्माण करायाचा होता. हाच प्रयत्न आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. संबंध मानव जातीच्या कल्याणासाठी आयुष्यभर प्रयत्नांची पराकाष्टा केली. जे कर्म त्यांनी केले त्या कर्माच्या जोरावरच जोपर्यंत पृथ्वीतलावर माणूस नावाचा प्राणी राहणार आहे तो पर्यंत त्यांचे नाव आदराने घेतले जाईल यात तिळमात्र शंका नाही. हा ज्ञानी पुरुष जगात कसा वागतो यासंबंधी असे म्हणता येईल की सूर्याचे उगवणे, गंगेचे वाहणे, वृक्षांचे फळणे किंवा अभ्रांचे येणेजाणे हे जसे अखंडपणे सुरू असते त्याप्रमाणे डॉ. बाबासाहेबांचा हा विचार अखंडपणे तेवत राहतो.

डॉ. बाबासाहेबांची एकूण जीवन कथा म्हणजे एक महाकाव्य आहे. राष्ट्रनिष्ठेचे एक जाज्वल्य,उत्तुंग उदाहरण आहे अपरंपार अवहेलना, उपेक्षा पचवीत त्यांनी आपल्या सबंध जीवनात भारताच्या सर्वांगीण व समतोल विकासासाठी बहुमोल योगदान दिलेले आहे. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेचे समुळ उच्चाटन करून भारत हे एक एकसंघ, आधुनिक आणि समर्थ राष्ट्र निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न होते. आजच्या आधुनिक काळात युवकांनी याचा विचार केला, सध्दम्मांचे आचरण केले तर या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेबांना हिच खरी आदरांजली ठरेल.



डॉ.बाबासाहेब हा एक विचार आहे आणि त्या विचारांचा स्वीकार केला तर ते स्वतःच्या बुद्धिमत्तेवर विसंबन राहून, अलौकिक धैर्याने,उच्च ध्येयासाठी अविरत झगडून, धुळीतून उत्तुंग शिखरावर जाऊन ते विराजमान होऊ शकतात.

**डॉ. दिलीप नागरगोजे,**
**उपप्राचार्य,**
**तत्त्वज्ञान विभाग,**
**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**

# सोलापूर विभागाने मध्य रेल्वेमध्ये पहिल्या स्कॉट ट्रान्सफॉर्मरची प्रमुख ट्रॅक्शन सिस्टम अपग्रेडसाठी कमिशनिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली



**सोलापूर/प्रतिनिधी :** सरकारच्या मिशन ३००० मेट्रिक टन चा प्रमुख टप्पा म्हणून मुंबई आणि चेन्नई दरम्यानच्या सुवर्ण चतुर्भुज मार्गावर राबविण्यात येणाऱ्या भारतीय रेल्वेच्या १२५ केव्ही ते २२५ केव्ही ऑटो ट्रान्सफॉर्मर (एटी) फीडिंग सिस्टम अपग्रेडेशन प्रकल्पाच्या अंतर्गत मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने एक मोठा टप्पा गाठला आहे. सोलापूर-वाडी विभागात सुरू असलेल्या आधुनिकीकरणाच्या कामांचा एक भाग म्हणून, विभागाने ट्रॅक क्रॉसिंग ऑपरेशन यशस्वीरित्या पूर्ण केले, अशा प्रकारे मध्य रेल्वेला येणाऱ्या गौडगाव ट्रॅक्शन सब स्टेशन (टीएसएस) साठी प्राप्त झालेल्या पहिल्या स्कॉट ट्रान्सफॉर्मरची कमिशनिंग प्रक्रिया सुरू झाली.

गौडगाव टीएसएस अशा ठिकाणी आहे जिथे फक्त दुसऱ्या बाजूला ट्रॅक ओलांडून जाता येते, म्हणूनच सुमारे १२० टन वजनाच्या पहिल्या स्कॉट ट्रान्सफॉर्मरच्या कमिशनिंगची सुरुवात करण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा होता. संपूर्ण मध्य रेल्वेवरील हा पहिलाच ट्रान्सफॉर्मर आहे आणि दौंड-सोलापूर आणि सोलापूर-वाडी विभागात प्रत्येकी ३ अशा प्रणाली अपग्रेडेशन प्रकल्पांतर्गत उभारल्या जाणाऱ्या ६ उपस्थानकांचा भाग आहे.

ही महत्त्वाची कृती प्रकल्पाचा एक महत्त्वाचा घटक आहे आणि विद्यमान १२५ किलो व्होल्ट (केव्ही) ट्रॅक्शन सिस्टमला अधिक कार्यक्षम २२५ केव्ही सिस्टममध्ये अपग्रेड करण्याचा उद्देश आहे. या अपग्रेडेशनमुळे भविष्यात विभागीय वेग १६० किमी प्रतितास पर्यंत वाढविण्यात आणि मिशन ३००० मेट्रिक टन (एमटी)



अंतर्गत ३००० दशलक्ष टन (एमटी) च्या उच्च मालवाहतुकीच्या लक्ष्याला पाठिंबा देण्यास लक्षणीय मदत होईल, ज्यामुळे या महत्त्वाच्या कॉरिडॉरची ऑपरेशनल क्षमता आणि विश्वासार्हता सुधारेल.

गौडगाव स्थानकाजवळील एका ठिकाणी ट्रॅक क्रॉसिंगचे काम करण्यात आले. हे ऑपरेशन ०४.१२.२०२५ रोजी दुपारी १२:३० ते ०३:१५ दरम्यान यशस्वीरित्या पूर्ण झाले. समन्वित ऑपरेशन दरम्यान, सुमारे १२० टन वजनाचा एक पुलर आणि ट्रेलर संयोजन, ज्यामध्ये ९५/१०० एमव्हीए स्कॉट ट्रान्सफॉर्मर होता, सुरक्षितपणे ट्रॅकवरून हलवण्यात आला. याव्यतिरिक्त, १२.३ एमव्हीए ऑटो ट्रान्सफॉर्मर (एटी) ने भरलेले ४ ट्रक देखील यशस्वीरित्या ओलांडण्यात आले, जे विभागासाठी एक महत्त्वपूर्ण लॉजिस्टिक आणि अभियांत्रिकी कामगिरी आहे.

ट्रॅक्शन सिस्टम: ट्रॅक्शन सिस्टममध्ये घटक आणि उपप्रणाली समाविष्ट आहेत जे रेल्वे वाहनांना चालना देणाऱ्या वाहनांसाठी प्रेरणा शक्ती (स्टीम, डिझेल, इलेक्ट्रिक) प्रदान करतात. यामध्ये ट्रॅक्शन मोटर्स, ट्रॅक्शन गियर्स आणि पिनियन्स, पॉवर सप्लाय सिस्टम्स, कंट्रोल सिस्टम्स, ट्रान्सफॉर्मर्स आणि कन्व्हर्टर्स समाविष्ट आहेत. वापरात असलेल्या ट्रॅक्शन सिस्टम्सची उदाहरणे म्हणजे डिझेल-इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह्ज, इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह्ज आणि इलेक्ट्रिक ट्रेन सेट्स (ईएमयू).

ऑपरेशनची सुरक्षित आणि कार्यक्षम अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी वरिष्ठ रेल्वे अधिकारी आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांची एक समर्पित टीम घटनास्थळी उपस्थित होती. तैनातीत इलेक्ट्रिकल टीआरडी (ट्रॅक्शन डिस्ट्रिब्युशन) विंग, इलेक्ट्रिकल कन्स्ट्रक्शन आणि सिव्हिल इंजिनिअरिंग विभागांची एक टीम समाविष्ट होती. गरज पडल्यास तात्काळ तांत्रिक सहाय्य देण्यासाठी गौडगाव लूप लाईनवर एक टॉवर वॅगन रणनीतिकदृष्ट्या स्थित करण्यात आला होता.

जड स्कॉट ट्रान्सफॉर्मर आणि त्यासोबत असलेल्या ऑटो ट्रान्सफॉर्मर्सची गुंतागुंतीची हालचाल सुलभ करण्यासाठी, संसाधनांचा एक व्यापक संच एकत्रित करण्यात आला. यामध्ये २४ कामगार, लाईन-साइड सेफ्टीसाठी ६ फ्लॅगमन, २ एक्स्कॅव्हेटर मशीन, २ पुलर, एक रोलर आणि एक पॉवर पॅक यांचा समावेश होता. अनुभवी मनुष्यबळासह या उपकरणांचा समन्वित वापर केल्याने संपूर्ण ऑपरेशन सुरळीत आणि सुरक्षितपणे आणि नियोजित कालावधीत पार पाडले गेले.

# घरात स्वच्छता करुनही झुरळं फिरतात? 'हे' घरगुती उपाय दूर करतील समस्या



झुरळ पाहिल्यानंतर बरेच लोक ओरडतात. अशा परिस्थितीत, जर तुमच्या घरात झुरळांची एक संपूर्ण फौज आली तर काय होईल याची कल्पना करा. परंतु, काही लोक सहजपणे झुरळे पकडतात आणि मारतात. पण अशा प्रकारे घर कधीही झुरळांपासून मुक्त होऊ शकत नाही. ते मुळापासून नष्ट करण्यासाठी काही ठोस व्यवस्था करणे आवश्यक आहे.

झुरळांमुळे अन्नातून विषबाधा होण्याचा धोका असतो. याशिवाय, टायफॉइड देखील होऊ शकतो. याशिवाय, जर तुम्ही झुरळाने स्पर्श केलेले काहीतरी खाल्ले तर तुम्हाला ॲलर्जी, पुरळ, डोळ्यांतून पाणी येणे यासारख्या समस्या देखील होऊ शकतात.

हे त्याच्या लाळेमध्ये असलेल्या विषाणूमुळे होते. अशा परिस्थितीत, त्यापासून त्वरित सुटका मिळवण्यासाठी उपाययोजना करणे खूप महत्वाचे आहे. झुरळांपासून मुक्त होण्यासाठी येथे दिलेल्या टिप्स खूप उपयुक्त ठरू शकतात.

कडुलिंब-

कडुलिंबामध्ये कीटकनाशक गुणधर्म असतात. अशा परिस्थितीत, झुरळांपासून मुक्त होण्यासाठी याचा वापर करणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. यासाठी रात्री झोपण्यापूर्वी झुरळांच्या लपण्याच्या ठिकाणी कडुलिंबाची पावडर किंवा त्याचे तेल शिंपडा. यामुळे झुरळे त्याच्या वासाने कायमचे पळून जातात.

लवंग-

लवंगाचा सुगंध खूप तीव्र असतो. ज्यामुळे कीटक त्याच्या जवळ येण्याचे टाळतात. अशा परिस्थितीत, जर तुमच्या घरात झुरळे दहशत निर्माण करत असतील तर तुम्ही लवंग वापरू शकता. यासाठी, तुम्हाला झुरळे आढळणाऱ्या ठिकाणांजवळ काही लवंगा ठेवाव्या लागतील.

तमालपत्र-

जर तुम्हाला झुरळांना न मारता कायमचे त्यांच्यापासून मुक्त करायचे असेल तर तमालपत्र तुमच्यासाठी प्रभावी ठरू शकते. यासाठी तमालपत्र बारीक करून पावडर बनवा किंवा गरम पाण्यात उकळवा. आता जिथे तुम्हाला झुरळे दिसतात तिथे फवारणी करा.

बेकिंग सोडा-

जर तुमच्या घरात खूप झुरळे असतील तर स्वयंपाकघरात ठेवलेला बेकिंग सोडा त्यांना दूर करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. यासाठी, तुम्हाला एक चमचा बेकिंग सोड्यात अर्धा चमचा साखर मिसळावी लागेल आणि झुरळे ज्या ठिकाणी येतात त्या ठिकाणी टाकावी लागेल. असे केल्याने, सर्व झुरळे साखरेकडे आकर्षित होतील आणि बेकिंग सोडा खाल्ल्यानंतर बाहेर येतील आणि मरतील.

००००००००००००००

# हिवाळ्यातही शरीरात पाण्याची कमतरता होतेय? हायड्रेटेड राहण्यासाठी आहारात सामील करा 'हे' पदार्थ

हिवाळ्यात आपल्याला स्वाभाविकच कमी तहान लागते. ज्यामुळे आपण पाण्याचे सेवन कमी करतो. शिवाय, आपले शरीर डिहायड्रेट होते, ज्यामुळे थकवा, अशक्तपणा, आळस, बद्धकोष्ठता आणि आम्लता वाढते. म्हणूनच, हिवाळ्यातही पुरेसे हायड्रेटेड राहणे महत्वाचे आहे.

परंतु, फक्त पाणी तुमच्या शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी पुरेसे नाही, म्हणून तुम्ही तुमच्या आहारात काही हायड्रेटिंग पदार्थांचा समावेश करावा. हे पदार्थ खाल्ल्याने तुमची त्वचा केवळ हायड्रेट होणार नाही तर इतर अनेक आरोग्य फायदे देखील मिळतील. आज आपण हिवाळ्यात शरीराला हायड्रेटिंग करणाऱ्या पदार्थांबद्दल जाणून घेऊया.

नारळ पाणी-

उन्हाळ्यात शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी आपण नारळ पाणी पितो. त्यात इलेक्ट्रोलाइट्स आणि हायड्रेटिंग गुणधर्म असतात, जे डिहायड्रेशन टाळण्यास मदत करतात. त्याचप्रमाणे, हिवाळ्यात नारळ पाणी पिणे देखील फायदेशीर मानले जाते. त्याचे आवश्यक गुणधर्म हिवाळ्यात शरीर सक्रिय ठेवण्यास मदत करतात. हायड्रेटेड राहिल्याने त्वचेच्या संसर्गाचा धोका देखील कमी होतो.

काकडी-

बरेच लोक सॅलडमध्ये काकडी खातात. त्यात आढळणारे अँटीऑक्सिडंट्स त्वचेला हायड्रेट ठेवण्यास मदत करतात. परंतु, त्याच्या थंड प्रभावामुळे, ते फक्त दुपारीच सेवन करावे. सकाळी किंवा रात्री ते सेवन केल्याने सर्दी आणि खोकला होऊ शकतो.

ओमेगा-३ फॅटी ॲसिड-

ओमेगा-३ फॅटी ॲसिड हे त्वचेसाठी आवश्यक मानले जाणारे आवश्यक खनिजे आहेत. मदत करण्यासाठी, तुमच्या आहारात अळशीच्या बिया, चिया सीड्स आणि अक्रोड सारखे ड्रायफ्रूट्स आणि बिया समाविष्ट करा. यामुळे त्वचेला हायड्रेटेड आणि आवश्यक पोषक तत्वे मिळतात.

लिंबूवर्गीय फळे-

लिंबूवर्गीय फळे खाणे देखील आपल्या त्वचेसाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. त्यात व्हिटॅमिन सी असते, जे त्वचा हायड्रेटेड आणि निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक आहे. म्हणून, हिवाळ्यात तुमच्या आहारात अधिक लिंबूवर्गीय फळांचा समावेश करा. सकाळी किंवा रात्री त्यांचे सेवन करू नका, कारण यामुळे पचनाच्या समस्या उद्भवू शकतात.

ग्रीन टी-

ग्रीन टीमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचा निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असतात. हिवाळ्यात, तुम्ही चहाऐवजी गरम ग्रीन टी घेऊ शकता. त्यात असलेले पोषक घटक तुमच्या एकूण आरोग्याला देखील फायदेशीर ठरतील. दिवसातून दोनदा सेवन करणे देखील तुमच्या शरीरासाठी फायदेशीर आहे.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१

# आज प्रज्ञासुर्य,तथागत महामानवाचा महापरिनिवार्ण दिन





**आज आंबेडकरी चळवळ विविधांगी आहे. ती राजकीय, साहित्य, जलसे, आंदोलनांच्या माध्यमातून मार्गोत्क्रमण करीत असते. धम्मक्रांतीनंतर आंबेडकरी चळवळ ही धम्मचळवळ झालेली आहे, अशी व्याख्या होत असली तरी आज आंबेडकरी चळवळ आणि धम्मचळवळ समांतर चालवावी लागत आहे. विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आयुष्यात सहा डिसेंबर म्हणजे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस ही अत्यंत महत्वपूर्ण विषय आहे. हा विषय केवळ साजरा करण्यापुरता मर्यादित नाही. हे हरेक कार्यकर्त्याने लक्षात घेणे आवश्यक आहे. बाबासाहेबांचा महापरिनिर्वाण दिवस म्हणजे जबाबदारीची जाणीव आहे. जयंतीच्या मिरवणुकीत नाचगाणे करणे म्हणजे जयंती साजरी झाली असे अनेक युवक युवतींना वाटते. त्यामुळे समाजात जे प्रदुषण पसरलेले आहे, ते आपण पाहतोच आहोत. आजपर्यंतच्या आंबेडकरी राजकीय नेतृत्वांसमोर अनेक प्रश्न उभे आहेत. प्रश्न काही संपलेले नाहीत. त्यांना जनतेची साथ किती मिळते, ही संशोधनाचीच बाब आहे. राजकीय क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर प्रदुषण पसरलेले आहे. त्यामुळे हे निळे आकाश अधिकच काळवंडत चालले आहे. आपल्या जगण्यातील आपले वर्तन चळवळीची दिशा ठरवित असते. कितीही मोठा विचारवंत असला तरी तो कसा वागतो यावर त्याची वैचारिक पातळी दिसून येते. तद्वतच कार्यकर्ता स्वार्थाने बरबटलेला असेल तर समाजाला कोणत्या दिशेने घेऊन जातो हे स्पष्टपणे दिसून येते.**

योग्य नेतृत्व समाजातून निर्माण झाले नाही की कार्यकर्ते सैरभैर होतात. कोणत्याही राजकीय पक्षाच्या वळचणीला जाऊन बसतात. त्यांचेच झेंडे नाचवत असतात. यामुळे सामाजिक दुही निर्माण होते. आंबेडकरी साहित्य चळवळीत अनेक कळप निर्माण झालेले आहेत. धम्म चळवळीस पोषक असे साहित्य निर्माण झाले पाहिजे असे काहींचे मत आहे, तर बरेचसे साहित्यिक प्रस्थापितांना खुश करण्यासाठी लिहितात. जलशांनी तळागाळापर्यंत आंबेडकरी विचार नेला पण आजच्या सुपारीबाज जलसेकारांनी या चळवळीचा दिशाच बदलून टाकली आहे, हे लक्षात येते.

आंबेडकरी पत्रकारिता हेही एक चळवळीचे मोठे हत्यार आहे. बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे चळवळीला वृत्तपत्र नसेल तर तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षासारखी होते. आज विविध वृत्तपत्रांत काम करणाऱ्या आंबेडकरी पत्रकारांची वाणवा नाही. त्यांना अनेक मर्यादा आहेत आणि जे स्वतंत्र आहेत त्यांची वाताहत सुरू आहे अशी असणारी परिस्थिती आहे. अगदी कालचेच उदाहरण घेता येईल. नांदेड सक्षम ताटे या बौद्ध तरुणाचा खून झाला. या घटनेच्या बातम्या विविध वृत्तपत्रांनी आपापल्या पद्धतीने प्रकाशित केल्या. हरेक वृत्तपत्राला आपली स्वतःची एक भाषा असते. परंतु ज्यांनी या घटनेतील जातीवाद अधोरेखित केला, तो इथे महत्त्वाचा आहे. वंचितच्या अंजली आंबेडकर यांनी भेट दिल्यानंतर अनेकांनी जातवर्चस्ववाद या शब्दाला वगळले. वास्तविक जात आणि त्या अनुषंगाने येणारे जातवर्चस्ववाद हे आजचेही वास्तव आहे. संबंधित प्रकरणाला जातीय वळण लागू नये आणि ते पुढे चिघळू नये म्हणून वृत्तपत्रांनी काही एक भूमिका घेणे आवश्यक असते. परंतु तेच जर सत्य असेल तर यामुळे खरे बाजूला पडण्याची शक्यता अधिक असते. तात्पर्य हे की आजच्या आंबेडकरी युवकांना फार जबाबदारीने वागावे लागेल अशी आजची परिस्थिती आहे. अक्षय भालेरावचे प्रकरण अजूनही लोक विसरलेले नाहीत. शितल मोरेला, नितीन आगेला न्याय मिळालेला नाही. थोडे भूतकाळात गेलो तर खैरलांजीचे प्रकरण लखखकन डोळ्यासमोर येते. अनेक तरुण हे प्रस्थापित समाजव्यवस्थेला बळी पडलेले आहेत आणि विस्मृतीत आहेत. प्रगतीच्या बाबतीत आम्ही निळ्या आभाळकडे झेपावलो असलो तरी आंबेडकरी समाजाला अन्याय अत्याचाराला नेहमीच तोंड द्यावे लागत आहे. कार्यकर्ता म्हणून उभे राहत असताना कोणत्याही राजकीय पक्षात असणारा कार्यकर्ता हा सर्वसाधारणपणे स्वाभिमान गहाण ठेवून राहतो. निवडणूकीच्या काळात आंबेडकरी म्हणजेच पर्यायी धम्मभूमिका बाजूला ठेवावी लागते.

आंबेडकरी कार्यकर्ता हा बहुआयामी असला तरी त्याला विचारवंताचे मार्गदर्शन आवश्यक असते. रस्त्यावरच्या चळवळी योग्य दिशेने जायला हव्यात यासाठीही ते आवश्यक असते. आंबेडकरी चळवळीत युवकांना मार्गदर्शन करणारे विचारवंत किंवा साहित्यिक हे मूळात स्वतंत्र विचारांचे असले पाहिजेत. ते प्रसिद्धीलोलुप किंवा पुरस्कारलोलुप असू नयेत. ते व्यवस्थेचा वापर करून घेण्याच्या नादात व्यवस्थेच्या दहशतीला शरण गेलेले असतात. त्यांच्या प्रतिभा गुलामच असतात. अशा प्रतिभा पारतंत्र्याच्या, लाचारिच्या आणि शोषणसत्ताक मानसिकतेच्या शब्दांची जुळवाजुळव करीत असतात. आंबेडकरी साहित्यिक आणि विचारवंतांचा शब्द नि आशय हा निर्भीड असायला हवा. तो कोणत्याही वर्चस्ववादी सत्तेपुढे झुकणारा नसावा. त्यांचे मार्गदर्शन कधीही किंवा कोणत्याही परिस्थितीत अन्यायाचे, विषमतेचे, असत्याचे आणि शोषणप्रवृत्तीचे अंशतःही समर्थन करणारे नसावे. असे असले तरी काहींच्या बाबतीत ही एक अपेक्षाच ठरते. अत्यंत नाजूक परिसरातही अनेक साहित्यिक विचारवंत हे मूग गिळून गप्प बसतात. हे फार भयंकर असते. येणारी पिढी ही मोठ्यांचे अनुकरण करीत असते. त्यांना योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. मात्र आजच्या घडीला असणारी व्यसनाधीनता हा मोठाच गंभीर प्रश्न बनला आहे. युवकांची व्यसनाधीनता हे आंबेडकरी समाजापुढे असलेले मोठे आव्हान आहे. गल्लीबोळातील कोणत्याही छोट्या मोठ्या कार्यक्रमापासून ते भीम जयंतीच्या भव्य मिरवणूकीपर्यंत हे अवघड जागेचे दुखणे होऊन बसले आहे. हे आंबेडकरी विचारधारेला घातक आहे. रस्त्यावरच उभे राहून मद्यपान करणाऱ्या लोकांमध्ये हे प्रकर्षाने दिसून येतात. धुम्रपान करणाऱ्या लोकांच्या समुहात आंबेडकरी युवक अधिक आढळतात. अनेक प्रकारच्या चोंय़ार्माय़ा आणि वेगवेगळ्या प्रकारच्या सुर्पाय़ा घेण्यात आंबेडकरी युवकांची आघाडी ही चिंताजनक बाब आहे. या कार्यकर्त्यांच्या आयुष्यात येणारा सहा डिसेंबर हा केवळ चैत्यभूमीचे वंदन घेऊन येत नाही तर सामाजिक जबाबदारीची जाणीव घेऊन येत आहे.

आंबेडकरी कार्यकर्त्यांच्या आयुष्यात येणारी भीम जयंती, बुद्ध जयंती, भीमा कोरेगाव, धम्मचक्र प्रवर्तन दिन वगैरे हे महत्त्वाचेच असतात. परंतु बाबासाहेबांचा महापरिनिर्वाण दिवस हा संकल्पदिवस आहे. तो राजकीय कार्यकर्त्यांसाठी फार महत्त्वाचा आहे. सगळे तत्त्वज्ञान झाकून ठेवून आपले अस्तित्व आणि स्वाभिमान गहाण ठेवण्याची वेळ आली तरी स्विकारावी लागते. ही त्याची मर्यादाच आहे. धम्मविचाराला तिलांजली देऊन सर्वधर्मसमभावाचा समरसतावाद हातात घेऊन गल्लोगल्ली उभे रहावे लागते. कोणत्याही राजकीय पक्षाची ध्येय धोरण आणि विचारधारा आपली मानावी लागते. सण, उत्सवासह सांस्कृतिक भूमिका बदलाव्या लागतात. निवडणुकीच्या काळात कोणत्याही थराला जावे लागते. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यालाही सामाजिक समरसतेचा बुरखा तोंडावर घेऊन बाहेर पडावे लागते. हे रस्त्यावरच्या चौकाचौकात लगडलेल्या भव्य दिव्य बॅनरवरुन लक्षात येते. अशा कार्यकर्त्यांच्या अनेक कृतींत बदल घडून येतो. त्याचे अख्खे कुटुंब आणि मित्र परिवारही बदलून जातो. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते अशाप्रकारे सामाजिक कार्यकर्तेही बनत असतात. विविध धार्मिक सणांना उपस्थित राहून योगदान देत असतात. दिवाळीपूर्वी झालेल्या अतिवृष्टी काळात पूरग्रस्तांना मदत केली. त्याची चमकोगीरीही केली. निवडणूक होणार असल्याचे कळताच असे सामाजिक कार्यकर्ते खूप मोठ्या प्रमाणावर उगवले. मात्र सच्चे प्रामाणिक कार्यकर्ते मावळत जातात. तेही होत आहे. या काळातील सण, उत्सव हे तर पर्वणीच असतात. महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या त्यांच्यासाठी फार महत्त्वाच्या असतात. एवढेच नव्हे तर पूरग्रस्तांना मदत करण्याच्या उद्देशात बरेच काही सामावलेले असते. विविध प्रकारच्या वस्तू तथा भेटवस्तूंचे वाटप केले जाते. ते त्यांच्यासाठी फलदायी असते असे वाटते. दिवाळीसारखा सण तर त्यांच्यासाठी मोठी आनंदपर्वणीच! या काळात इच्छुक उमेदवारांकडून दिवाळी साहित्य, फराळ, भेटीगाठी, शुभेच्छा कार्डांचे वाटप केले जातात. स्थानिक ते राष्ट्रीय नेत्यांचे मोठमोठे बॅनर लावले जातात. सामाजिक बांधिलकी म्हणून विविध उपक्रम राबवून लोकसंपर्क वाढविला जातो. सोशल मीडियावरील सक्रियता डोळेभरुन पावते. हे सर्व काही अगदी डोळ्यासमोर घडले.

आंबेडकरी समाजातील अनेक होतकरू, अभ्यासू युवक युवती चळवळीपासून लांबच असतात. त्यांच्या आयुष्यात सहा डिसेंबर येत नाही असे नाही. त्यांचा अभ्यासही असतो. परंतु या चळवळीच्या निष्ठा निर्माण होण्यासाठी वेळ लागतो. बुद्धिवंतांची चळवळीला फार मोठी गरज आहे. समाजाला आपण काही देणे लागतो, ही भावना निर्माण होण्यासाठी वेळ लागतो. परंतु या चळवळीत उतरण्यासाठी अर्धे अधिक आयुष्य निघून जाते. असे कार्यकर्ते सेवानिवृत्तीनंतर सक्रिय होतात. धम्म चळवळीत योगदान देत राहतात. ऐन उमेदीच्या काळात त्यांना काही सूचत नाही. नोकरपेशा वर्गातील लोकांना आंबेडकरी सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीत काम करता येत नाही, असे नाही. करता येते. राजकीय कार्यकर्त्यांचे बोट धरून चालता येत नसले तरी हितसंबंध ठेवता येतात. खाजगी सेवांमधील कर्मचारी तर उघड राजकारण करीत असतात. याला असलेली आर्थिक पार्श्वभूमीही महत्त्वाची आहे. सर्वसामान्य कर्मचाऱ्यांना ते शक्यही होत नाही. कार्यकर्ता म्हणून कोणत्याही टप्प्यावर पुढे आलो तरी राजकारण ही अत्यंत दुष्कर बाब आहे, अशी समजूत अनेकांची झालेली आहे. आपला हा काही प्रांत नाही, आपल्याला हे काही जमणार नाही ही भावना निर्माण होते. म्हणूनच मोक्याच्या आणि र्माय़ाच्या जागा मिळविलेले अधिकारीही राजकारणापासून लांबच राहतात. सेवानिवृत्तीनंतर तरी आपले काही योगदान असावे अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. मग पुढे या लोकांत आवड असलीच तर त्यांच्यातील कार्यकर्ते पण उशिरा जागवते. हे उशिरा सुचलेले शहाणपण असले तरी त्यांनी आधी पोटाचा प्रश्न सोडवलेला असतो. बाबासाहेब म्हणतात की, अगोदर शिक्षण घ्या, मग पोटाचा प्रश्न सोडवा, मग कार्यकर्ता बना कारण उपाशी पोटी बनलेला कार्यकर्ता लाचार बनतो. त्यामुळे आपली आर्थिक परिस्थिती सुधारणे गरजेचे असते. असे असतानाही काही जणांना खूप घाई झालेली असते. पुढे ते फार काळ टिकत नाहीत. आंबेडकरी विचारातच यशस्वितेच्या सर्व पायऱ्या आहेत हे महापरिनिर्वाण दिनानिमित्त समजून घेण्यासाठी असलेला दिवस आहे.

युवतींच्या बाबतीतही सर्व काही आलबेल आहे असे नाही. अभ्यासू मुली वगळल्या तर बाकींच्यासमोर संसार सुखाचा हेच ध्येय असते. शासन प्रशासनात असलेल्या मुली किंवा स्त्रिया ह्या आपले कर्तव्य आणि आपले कुटुंब यांनाच प्राधान्य देतात. चळवळीचे बोट धरून राहणाऱ्या अगदी बोटावर मोजण्या इतक्या असतील. महिलांचे अनेक प्रश्न आहेत. परंतु ते सोडवतच आपल्या आयुष्यात येणारा सहा डिसेंबर आपल्याला काय सांगतो याचे चिंतन आवश्यक आहे. गेल्या दोन दशकांमध्ये महिलांसाठी अनेक चळवळी झाल्या. त्यांचे अधिकार, हक्क, आरोग्य, आर्थिक परिस्थिती, मिळणाऱ्या सुविधा याबाबत प्रामुख्याने लक्ष वेधण्यात आले होते. शहरांबरोबरच गाव पातळीवरही महिला पुढे सरसावल्या आहेत. कारण त्या पुरुषांपेक्षा काही कमी नाहीत ही भावना जोर धरू लागली आहे. महिला आत्मविश्वासाने बोलताहेत, काहीतरी करून दाखवण्याची महिलांमधील जिद्द वाढली आहे. स्त्रीच्या राजकारणातील सहभागाविषयीच्या वाढणाऱ्या प्रतिकूलतेला स्त्रियांनी एक शक्ती बनवण्यात यश मिळवले आहे. स्त्रियांनी राजकारणाविषयी नकारात्मकता न बाळगता, राजकारणात आलं पाहिजे. महिला चळवळीने कात टाकून केवळ समाजकारणच न करता राजकीय आरक्षणासाठीही लढले पाहिजे आणि स्त्रियांचं प्रतिनिधित्व करण्यासाठी समाजभान असलेल्या चांगल्या महिला राजकारणात सहभागी झाल्या पाहिजेत. महिला राजकीय क्षेत्रात सक्रीय होताहेत हे अत्यंत महत्त्वाचे असुन त्यातून येणारा काळ नक्कीच बदललेला असेल. राजकारणात येऊनही चांगलं समाजकारण करता येतं. महिला राजकीय आरक्षणासाठी लढता येऊ शकतं. परंतु ग्रामपंचायत सदस्य पदापासून पुढे सगळीकडे नवरेच कारभारी असतात, हे चित्र बदलायला हवं. आंबेडकरी समाजातील महिला मोठ्या प्रमाणावर धम्मचळवळीत सक्रीय आहेत. मात्र, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रासह युवा वर्ग आणि महिला कार्यकर्ता म्हणून पुढे आल्या पाहिजेत. त्यांनी इतर सर्वसामान्य महिलांचे प्रतिनिधित्व केले पाहिजे. एखाद्या देशाने किती प्रगती केली याचे मोजमाप त्या देशातील स्त्रियांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीवरून करावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारसरणी होती. हाच संदेश आपल्याला आपल्या आयुष्यात येणारा सहा डिसेंबर देतो आहे.

## आजारापासून दूर राहण्यासाठी — डॉक्टर टीप्स



हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जीवनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. अलीकडच्या काळात स्नायूंचं दुखणं ही तरुणाईसमोरची मोठी समस्या ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे ड जीवनसत्त्वाची कमतरता. शहरी भागात राहणारे ८० ते ९० टक्के लोक ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासांनी ग्रस्त आहेत. ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेनं हार्मोनमध्ये कमी निर्माण होते. त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. उन्हाचं प्रमाण कमी मिळालं, तरच ड जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होते. या जीवनसत्त्वाचा डोस नियमितपणे मिळाला, तर हाडं आणि स्नायूंचं दुखणं कमी होतं.शरीराच्या मजबुती आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी हे जीवनसत्त्व उपयोगी आहे. त्यामुळे त्याचा डोस पुरेशा प्रमाणात घेणं गरजेचं आहे. (**क्रमशः**)




## विनोद

**बंडू शाळेतून धावतच घरी आला आणि आईला म्हणाला, ङ्गआई, आज वर्गात शिक्षकांच्या प्रश्नाला माझ्याशिवाय कुणीच उत्तर देऊ शकलं नाही!फ आईने विचारले, ङ्गअरे वा. प्रश्न काय होता.फ शिक्षकांच्या टेबलाचा पाय कोणी मोडला!फ**

## संदेश

Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur sharabat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon?
Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## सुविचार


प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.
– पु.ल. देशपांडे



**संस्कृत सुभाषित**
**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।**

अर्थ –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

## उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

## आडवे उत्तर

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

## उभे उत्तर

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ







# लग्नानंतर ४ दिवसांतच समांथा घराबाहेर

दक्षिण भारतीय सिनेसृष्टीतील टॉप अभिनेत्री समंथा रूथ प्रभू आणि 'द फॅमिली मॅन' चे दिग्दर्शक राज निदिमोरू यांच्या लग्नाला पाच दिवस झाले आहेत. या जोडप्याने १डिसेंबर २०२५ रोजी लग्नगाठ बांधली.चाहते याबद्दल काय म्हणाले? लग्नाला किती दिवस झाले की समंथा कामावर परतली?सध्या समंथा कोणत्या चित्रपटाचे शूटिंग करतेय?डरारपींहर ठींह झीरलर्ही: समांथा रूथ प्रभु आणि राज निदिमोरू यांच्या लग्नाला अवघे चार ते पाच दिवस झाले असताना समांथानं एक मोठा निर्णय घेतला आहे. इतर जोडप्यांप्रमाणं या नव्या इनिंसाठी अपेक्षित सुट्टी न घेताच समांथानं इतर गोष्टींना प्राधान्य दिल्याचं पाहायला मिळालं आहे. ज्यासाठी ती घराबाहेरसुद्धा पडली आहे. तामिळनाडूतील कोइम्बतूर येथील ईशा योग केंद्रातील लिंग भैरवी मंदिरात लग्न केले. समंथाने तिच्या इंस्टाग्रामवर लग्नाचे फोटो शेअर केल्यानंतर चाहत्यांचा आनंद गगनापार गेला. पण, आता मात्र ती यातूनही बाहेर पडली आहे. अवघ्या ४ दिवसांतच समांथा घराबाहेर? लग्नानंतर एकिकडे व्यक्तिगत आयुष्याला प्राधान्य देत असतानाच समांथानं तिच्या कामालासुद्धा प्राधान्य दिलं आहे. तिने अलीकडेच तिच्या आगामी चित्रपटाच्या सेटवरून एक फोटो शेअर केला आहे. या फोटोला समांथाने एक छानशी कॅप्शनसुद्धा दिली आहे. ही कॅप्शन सध्या चाहत्यांना खूप पसंत पडत आहे.

तिच्या लग्नाबद्दल सर्वजण कमेंट करत होते आणि शुभेच्छा देत होते. दरम्यान, लग्नाच्या पाच दिवसांनी समांथा कामावर परतली आहे. शुक्रवारी तिने तिच्या आगामी 'मा इंती बंगाराम' चित्रपटाचे शूटिंग सुरू केले. समांथाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर तिच्या व्हॅनिटी व्हॅनमधील एक फोटो शेअर केला. फोटोमध्ये अभिनेत्री मेकअप खुर्चीवर बसून दिग्दर्शक नंदिनी रेड्डी आणि मेकअप आर्टिस्ट अवनी रंभिया यांच्यासोबत गप्पा मारताना दिसत आहे. यावेळी तिच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसून येत आहे. तिने पोस्टला डश्‌ ॠ असे कॅप्शन दिले आणि चित्रपटाचा हॅशटॅग जोडला. फोटोमध्ये, समांथाच्या हातावर आणि पायावर तिच्या लग्नाची मेहंदी स्पष्टपणे दिसत आहे. तिने शूटसाठी कॅज्युअल टी-शर्ट आणि जीन्स घातली होती. समांथाच्या आणि राजच्या लग्नाची भाकितं ३० नोव्हेंबरपासून केली जात होती. दुसऱ्या दिवशी, समांथाने स्वतः तिच्या लग्नाची पुष्टी केली आणि लग्नाचे फोटो शेअर केले. विशेष म्हणजे, नंदिनी रेड्डी, शिल्पा रेड्डी आणि क्रेशा बजाज देखील लग्नात सहभागी झाल्या होत्या. समांथाने लग्नासाठी लाल आणि सोनेरी पारंपारिक साडी घातली होती. त्या लूकने समांथाच्या चाहत्यांना अगदी भूरळ घातली.

# धर्मेंद्र यांनी त्यांची मालमत्ता त्यांच्या कोणत्याही मुलांना दिली नाही





चाहत्यांना धर्मेंद्र यांची शेवटची झलक का दाखवण्यात आली नाही? हेमा मालिनी यांनी मौन सोडले

धर्मेंद्रच्या प्रार्थना सभेत हेमा मालिनींची गैरहजेरी

धरमजी माझ्यासाठी खूप काही होते...' धर्मेंद्र यांच्या निधनानंतर हेमा मालिनी यांची पहिली पोस्ट

धर्मेंद्र यांना केवळ पद्मभूषणच नाही तर हे पुरस्कार देखील मिळाले, अनेक विक्रमही केले

अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाने देशभरात शोककळा पसरली; मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली

धर्मेंद्र यांच्या मृत्युपत्रातून उघड झाले मोठे रहस्य: मुलांना वडिलोपार्जित संपत्तीचा वारसा मिळाला नाही

उ्हरीशपवीर

२४ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी धर्मेंद्र यांचे निधन झाल्याने संपूर्ण भारतीय चित्रपटसृष्टी शोकाकुल झाली. त्यांची लोकप्रियता केवळ त्यांच्या काळापुरती मर्यादित नव्हती, तर नवीन पिढ्यांनीही त्यांना तितक्याच आदराने स्वीकारले. परिणामी, त्यांच्या मृत्युपत्राचे प्रकटीकरण चर्चेचा विषय बनले आहे.

धर्मेंद्र यांनी त्यांची वडिलोपार्जित मालमत्ता त्यांच्या कोणत्याही मुलांना दिली नाही: सनी देओल, बॉबी देओल, ईशा देओल, अहाना देओल, अजिता किंवा विजेता देओल. त्यांनी त्यांच्या हयातीत ही जमीन दुसऱ्या कोणाला तरी दिली होती.

पंजाबच्या मातीशी अतूट नाते

धर्मेंद्र यांचे पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील डांगो गावाशी खोल नाते आहे. त्यांनी त्यांच्या बालपणाची पहिली तीन वर्षे तिथे घालवली. माती आणि विटांनी बनवलेले ते जुने घर आता कोट्यवधी रुपयांचे आहे, परंतु त्या गावाशी असलेले त्यांचे भावनिक नाते नेहमीच अधिक मौल्यवान राहिले आहे.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की धर्मेंद्र यांनी त्यांचे मृत्युपत्र सुमारे आठ ते दहा वर्षांपूर्वी, जेव्हा त्यांची तब्येत चांगली होती, तयार केले होते. त्यांचा निर्णय आर्थिक गणितांवर आधारित नव्हता, तर त्यांच्या वडिलांनी लहानपणापासूनच त्यांच्यावर रुजवलेल्या कौटुंबिक परंपरेवर आधारित होता.

धर्मेंद्रने त्यांची मालमत्ता त्यांच्या पुतण्यांना का दिली?धर्मेंद्र यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला आणि त्यांच्या यशामुळे ते मुंबईसारख्या मोठ्या शहरात स्थायिक झाले, तरीही ते त्यांच्या गावातील मुळे विसरले नाहीत. परंतु त्यांना हे देखील समजले की मुंबई आणि इतर शहरांमध्ये राहणारे त्यांचे जवळचे कुटुंब डांगो घर आणि जमीन नियमितपणे सांभाळू शकणार नाही.

-डडज ठए-ऊ चाहत्यांना धर्मेंद्र यांची शेवटची झलक का दाखवण्यात आली नाही? हेमा मालिनी यांनी मौन सोडले


दरम्यान, त्याच्या काकांचे नातू किंवा पुतणे तिथेच राहिले आणि वर्षानुवर्षे जमीन आणि कौटुंबिक वारसा सांभाळत राहिले. धर्मेंद्रला वाटले की त्याच्या पूर्वजांच्या वारशाची काळजी घेण्यासाठी तेच सर्वोत्तम आहेत. म्हणून, त्याने त्याची अंदाजे २.५ एकर वडिलोपार्जित मालमत्ता त्यांना हस्तांतरित केली. या जमिनीची किंमत अंदाजे ५ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. ज्यांना ती मिळाली त्यांच्यामध्ये बुटा सिंग यांचाही समावेश होता, जो अजूनही लुधियाना येथील एका कापड गिरणीत काम करतो. धर्मेंद्र यांचा हा निर्णय केवळ कौटुंबिक परंपरेबद्दलचा त्यांचा आदरच नाही तर त्यांच्या मुळांबद्दलचे त्यांचे गाढ प्रेम देखील दर्शवितो.

# धर्मेंद्र यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त देओल कुटुंबाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला

यावर्षी देओल कुटुंब धर्मेंद्र यांचा ९०वा वाढदिवस भव्यदिव्य पद्धतीने साजरा करण्याची तयारी करत होते, परंतु वेळ आणि नशिबाची योजना वेगळीच होती. दुर्दैवाने, त्यांच्या वाढदिवसाच्या काही दिवस आधीच या महान अभिनेत्याचे निधन झाले. दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांची जयंती ८ डिसेंबर रोजी आहे. देओल कुटुंब तो संस्मरणीय पद्धतीने साजरा करण्याची तयारी करत आहे.

धर्मेंद्र यांच्या अस्थी विसर्जनाच्या वेळी सनी देओलचा राग पुन्हा पापाराझींवर निघाला, किती पैसे हवे आहेत विचारले

अभिनेता धर्मेंद्र यांचा ९० वा वाढदिवस खंडाळा येथील त्यांच्या फार्महाऊसमध्ये साजरा केला जाईल. सनी देओल आणि बॉबी देओल त्यांच्या वडिलांचा ९०वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करू इच्छितात. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या सेलिब्रेशनमध्ये ते धर्मेंद्र यांच्या चाहत्यांनाही सामील करतील. वृत्तानुसार, सनी देओल आणि बॉबी देओल यांनी हा खास दिवस सुंदर पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. वृत्तानुसार, सनी देओल आणि बॉबी देओल कुटुंबातील सदस्यांसह धर्मेंद्र यांच्या वारशाला श्रद्धांजली म्हणून



त्यांचा ९० वा वाढदिवस साजरा करण्याची योजना आखत आहेत. हा कार्यक्रम खंडाळा येथील अभिनेत्याच्या फार्महाऊसवर होणार आहे. दिवस खास बनवण्यासाठी चाहते देखील सहभागी होतील. या दिवशी फार्महाऊसचे दरवाजे चाहत्यांसाठी खुले असतील

-डडज ठए-ऊ वडील धर्मेंद्र यांच्या निधनानंतर सनी देओलने दिली पहिल्यांदाच सोशल मीडियावर प्रतिक्रिया

अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनानंतर चाहत्यांना त्यांचे शेवटचे दर्शन घेता आले नाही. कुटुंबाने घाईघाईने गुप्तपणे त्यांचे अंतिम संस्कार केले. वृत्तानुसार, देओल कुटुंबाने विचार केला आहे की अनेक चाहत्यांना धर्मेंद्र यांना शेवटचे भेटण्याची किंवा पाहण्याची संधी हवी होती. म्हणूनच, ज्येष्ठ अभिनेत्याच्या ९० व्या जयंतीदिनी, जे चाहते येऊन त्यांना श्रद्धांजली वाहू इच्छितात आणि कुटुंबाला भेटू इच्छितात त्यांच्यासाठी फार्महाऊसचे दरवाजे उघडण्याचा निर्णय घेतला आहे. कार्यक्रमाचे आयोजन करण्याची तयारी आधीच साधेपणाने सुरू झाली आहे. गेल्या वर्षी कुटुंबाने धर्मेंद्र यांचा ८९ वा वाढदिवस खास पद्धतीने साजरा केला होता. या काळात

# अभिनेत्रीचा ड्रेस पाहून भडकलेले अमिताभ बच्चन

: बॉलिवूडमधील प्रसिद्ध जोडी पैकी एक म्हणजे अमिताभ बच्चन आणि जीनत अमान. दोघांनी मिळून अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. पण तुम्हाला माहिती आहे का, एकदा बिग बींनी जीनत अमानला तिच्या कपड्यांवरून अशी समज दिली होती की जीनत थक्कच झाली होती. अलिकडेच जीनत अमान यांनी सोशल मीडियावर हा किस्सा शेअर केला आणि पुन्हा एकदा या प्रसंगाची चर्चा रंगली.

हा किस्सा आहे १९७९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'द ग्रेट गैम्बलर' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यानचा. या चित्रपटाला तब्बल ४६ वर्षे पूर्ण झाली असूनही, यातील काही प्रसंग आजही लोकांच्या लक्षात आहेत. या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि जीनत अमान मुख्य भूमिकेत होते. शूटिंगदरम्यान घडलेल्या एका सीनबद्दल जीनतने आठवण सांगितली.

'...तर मुलं छेडणारच ना'

एका सीनमध्ये काहीजण जीनतला छेडतात आणि याचीच तक्रार देण्यासाठी ती पोलीस स्टेशनमध्ये त्यांना घेऊन जाते. इथे अमिताभ बच्चन यांचा अँग्री-इन्स्पेक्टर अवतार दिसतो. सीनमध्ये ते जीनतला म्हणतात की, 'तुम्ही अशा प्रकारे कपडे घातले तर मुलं छेडणारच ना'. हा संवाद जीनतला त्या काळात खूप धक्कादायक वाटला होता.

हा प्रसंग आठवत जीनत यांनी सांगितले की, 'त्या काळी मला वाटत होतं की समाजातील हे कठोर नियम कधीच बदलणार नाहीत. परंतु आता जाणवतं की बऱ्याच गोष्टींमध्ये बदल झाला आहे. आजही काही लोक नैतिकतेचे ठेकेदार आहेत पण लोकांची विचारसरणी पूर्वीपेक्षा नक्कीच बदलली आहे.'



जीनतने महिलांना विचारला सवाल

आपल्या पोस्टमध्ये जीनतने महिलांना थेट प्रश्न विचारला. 'हा सीन पाहून तुम्हाला इन्स्पेक्टरचा 'खुद ही बुलावा देती हो' हा डायलॉग ऐकून राग आला नाही का? जीनतने सांगितले की, त्यांनी हा सीन एका महिलेच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी तिला दाखवला. तेव्हा तिने हसतच उत्तर दिलं 'काय लूझर आहे हा

जीनत म्हणाल्या, 'हे ऐकून मला खूप हसू आलं. आता माझा दृष्टीकोनही खूप व्यवहारिक झाला आहे. प्रत्येकाला आपल्याला हवे तसे कपडे घालण्याचा अधिकार आहे. पण तेवढंच खरं की जग आपल्या विचारांवर चालत नाही. काही ठिकाणी काही कपडे अधिक योग्य वाटतात हेही वास्तव आहे.'

पोस्टनंतर चाहत्यांची प्रतिक्रिया

जीनत अमानच्या या आठवणीने सोशल मीडियावर चाहत्यांनी मिश्र प्रतिक्रिया दिल्या. एकीकडे बरेच लोक म्हणतायत की महिलांना कपड्यांवरून दोष देण्याची मानसिकता आजही पूर्णपणे संपलेली नाही.

# लंडनमध्ये उभारला शाहरुख अन् काजोलचा ब्रॉन्झचा पुतळा; कारणही तसं खास




: भारतातील सदाबहार चित्रपटांपैकी एक म्हणजे 'दिलवाले दुल्हनीया ले जायेंगे' हा चित्रपट. अलिकडेच, लंडनमध्ये ऊऊछगच्या राज आणि सिमरनचा एक कांस्य पुतळा तयार करण्यात आला. या कार्यक्रमात शाहरुख खान आणि काजोल यांनी त्यांच्या आयकॉनिक पुतळ्याचे अनावरण केले. दरम्यांन थेट लंडनमध्ये भारतीय चित्रपटाचा पुतळा पहून दोघे भावूक झाले.

बॉलिवूडचा कल्ट क्लासिक चित्रपट, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, याचे चाहते केवळ भारतातच नाहीत तर जगभरात आहेत. राज आणि सिमरनची जोडी परदेशातही खूप पसंत केली जाते. अलिकडेच, लंडनमध्ये राज आणि सिमरनचा एक कांस्य पुतळा तयार करण्यात आला. कांस्य पुतळ्यात राज आणि सिमरन त्यांच्या आयकॉनिक लूकमध्ये दिसत आहेत.

शाहरुख खान आणि काजोल यांनी त्याचे अनावरण करण्यासाठी स्वतः भेट दिली. 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या चित्रपटाच्या पदर्शनाला ३० वर्ष पुर्ण झाले. या निमित्ताने शाहरुख खान आणि काजोल यांनी लंडनच्या लेस्टर स्केअरमध्ये राज आणि सिमरन यांच्या कांस्य पुतळ्याचे अनावरण केले. बॉलीवूडसाठी हा एक महत्त्वाचा क्षण आहे, कारण पहिल्यांदाच एखाद्या भारतीय चित्रपटाला लेस्टर स्केअरमध्ये पुतळा देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

**लंडनमध्ये शाहरुख खान आणि काजोलच्या खास फोटो पोझ**

लेस्टर स्केअरच्या लोकप्रिय 'सीन्स इन द स्केअर' ट्रेलमध्ये सामील होणाऱ्या या पुतळ्याचे अनावरण शाहरुख खान आणि काजोल, तसेच यशराज फिल्म्सचे सीईओ अक्षय विधानी आणि हार्ट ऑफ लंडन बिझनेस अलायन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोझ मॉर्गन यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमात भारतीय चित्रपटांची युकेमध्ये किती क्रेझ आहे हे स्पष्ट दिसलं. पुतळ्याचे अनावरण केल्यानंतर शाहरुख खान आणि काजोलने खास फोटो पोझ दिल्या. पुतळा पाहून शाहरुख भावुक पुतळ्याच्या अनावरणाच्या कार्यक्रमात शाहरुख खानने असा सन्मान मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि म्हटले की हा चित्रपट त्याच्या हृदयाच्या खूप जवळचा आहे. हा चित्रपट खऱ्या मनाने बनवलेला होता आणि या चित्रपटाचा उद्देश प्रेम आणि सद्भावना पसरवण्याचा होता. त्याने सांगितले की या चित्रपटाने त्याला ओळख दिली. त्याने यूकेच्या लोकांचे आणि हार्ट ऑफ लंडन बिझनेस अलायन्सचे मनापसून आभार मानले. शाहरुख म्हणाला, हा एक भावनिक क्षण आहे ज्याने अनेक आठवणी परत आणल्या. चित्रपटाला जगभरातून मिळालेल्या प्रेमाचा मला खूप अभिमान आहे आणि मी हा क्षण संपूर्ण डीडीएलजे टीम, दिग्दर्शक आदित्य चोप्रा आणि यशराज फिल्म्स कुटुंबासोबत शेअर करू इच्छितो. मी हा क्षण कधीही विसरणार नाही.


काजोलच्या आनंदाला सीमा नाही

डीडीएलजेची सिमरन, काजोल म्हणाली की, ३० वर्षांनंतरही लोकांकडून इतके प्रेम मिळाल्याने तिला खूप आनंद झाला. ती म्हणाली, लंडनमध्ये पुतळ्याचे अनावरण होताना पाहणे म्हणजे आपल्या इतिहासाचा एक भाग पुन्हा जिवंत करण्यासारखे होते. पिढ्यानपिढ्या पसंत केली जाणारी कहाणी आहे.

# सोनू निगमने त्याची मालमत्ता दिली भाड्याने

बॉलिवूड सेलिब्रिटी आता फक्त चित्रपटांमधूनच नव्हे तर रिअल इस्टेट गुंतवणुकीतूनही भरपूर पैसे कमवत आहेत. प्रसिद्ध गायक सोनू निगम यांचाही या यादीत समावेश झाला आहे. सोनू निगमने मुंबईतील सर्वात महागडे आणि प्रतिष्ठित व्यावसायिक केंद्र असलेल्या वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) जवळ एक मोठे व्यावसायिक युनिट भाड्याने दिले आहे. महिन्याल १९ लाख रुपये भाडे मिळणार आहे. सोनू निगम याने मुंबईतील सांताक्रूझ पूर्व भागात असलेल्या ट्रेड सेंटर बीकेसी येथे त्याचे ४,२५७ चौरस फूट व्यावसायिक युनिट भाड्याने दिले. ही मालमत्ता पाच वर्षांच्या करारासाठी भाड्याने देण्यात आली होती, ज्याची अधिकृत नोंदणी डिसेंबर २०२५ मध्ये झाली. नोंदणी कागदपत्रांनुसार, या उत्तम मालमत्तेसाठी पहिल्या वर्षाचे मासिक भाडे १९ लाख निश्चित करण्यात आले आहे. हा करार फक्त भाड्यापुरता मर्यादित नाही. भाडेकरूने सोनू निगमला ९० लाखांचे डिपॉझीट दिले आहे. शिवाय, करार कायदेशीर करण्यासाठी ३.२७ लाख मुद्रांक शुल्क आणि १,००० नोंदणी शुल्क जमा करण्यात आले.

५ वर्षात १२.६२ कोटींचा नफा



हा भाडे करार पूर्ण पाच वर्षांसाठी असेल, ज्यामुळे सोनू निगमला एकूण १२.६२ कोटी भाडे उत्पन्न मिळेल. हा भाडेपट्टा करार निश्चित वाढीच्या दरावर आधारित आहे. भाडे दरमहा १९ लाखांपासून सुरू होईल. हे भाडे दरवर्षी निश्चित दराने वाढेल आणि पाचव्या वर्षापर्यंत दरमहा २३.१५ लाखांपर्यंत पोहोचेल. मालमत्तेच्या किमतींमध्ये चढ-उतार असूनही, भाडेपट्टा करारातील ही वार्षिक वाढ गुंतवणूकदारांना निश्चित परतावा प्रदान करते.

सांताक्रूझ पूर्व हे एक उत्तम ठिकाण का आहे?

सांताक्रूझ पूर्व परिसर, जिथे सोनू निगमचे युनिट आहे, ते

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत लातूर कारागृहात जनजागृती शिबीर




**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या किमान समान कार्यक्रमानुसार एड्स या आजाराबाबत जनजागृतीसाठी लातूर कारागृह येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर जिल्हा न्यायालय व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे व्यंकटेश गिरवलकर, वैद्यकीय महाविद्यालयाचे समुपदेशक तानाजी भोसले, उडाण संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक प्रमोद सोमवंशी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे श्री. ढोपरे यांनी मार्गदर्शन केले. कारागृह अधीक्षक श्री. मुलाणी यावेळी उपस्थित होते.

यावेळी श्री. गिरवलकर यांनी एड्स आजाराबाबत कैद्यांना एचआयव्ही, एड्स म्हणजे काय, या आजार कसा पसरतो व त्याची लक्षणे काय आहेत, याबाबत माहिती दिली. एड्सबाबत असलेली उपचार पध्दतीबाबत तसेच सदरील आजारास प्रतिबंध कसे करता येईल, याबाबत कैद्यांना मार्गदर्शन केले.

## मुक्त विद्यापीठ - युवाशक्ती फाऊंडेशनतर्फे राज्यात आठ रोजगार मेळाव्यांचे नियोजन पहिला मेळावा १२ डिसेंबरला नाशिकला; २० कंपन्यांमधील २१५० जागा उपलब्ध



**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि युवाशक्ती फाऊंडेशन (नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या आठही विभागीय केंद्रांतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील बेरोजगार तरुण-तरुणींसाठी आठ रोजगार मेळाव्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार येत्या शुक्रवार दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत नाशिक विद्यापीठ मुख्यालयातील कृषी विज्ञान केंद्र येथे पहिल्या रोजगार मेळावयाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनाखाली होणाऱ्या या मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील २० पेक्षा अधिक नामांकित व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधील २१५० हून अधिक रिक्त पदे उपलब्ध असणार आहेत.

या नोकरी मेळाव्यासाठी सर्व शाखेतील पदवीधर, आय. टी.आय. (सर्व ट्रेड्स), डिप्लोमा, इंजिनिअरिंग (इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल), सी.एन.सी. ऑपरेटर आणि सीपेट शिक्षण पूर्ण केलेले तसेच दहावी, बारावी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी मोफत अर्ज करू शकतात. त्यासाठी https://forms.gle/iWT8edXwgXM58ZVD8 ही लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार १५ ते ३० हजार रुपये वेतनासह त्या त्या कंपनीच्या धोरणानुसार जेवण, निवास, बस सुविधा आणि ओव्हरटाईमही लागू असेल. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी ९८२२५ ४४०९४, ९९२२३ ७९३१९, ८६९८५ ०४७५२, ९०२१४ २२४७९ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, विभागीय संचालक डॉ. एस. आर. निकम, ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा संचालक प्रा. कैलास मोरे, युवाशक्ती फाऊंडेशनचे संचालक डॉ. सतीश पवार व श्री. विक्रमादित्य पवार यांनी केले आहे.

## मुक्त विद्यापीठात एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाची उद्बोधन कार्यशाळा संपन्न

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाची उद्बोधन कार्यशाळा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालक डॉ. संजीवनी महाले यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित चार दिवसांची सदर कार्यशाळा दोन टप्प्यात ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने झाली. त्यात राज्यभरातील विविध अभ्यासकेंद्रातील केंद्रप्रमुख, केंद्र समन्वयक संमंत्रक व संशोधन मार्गदर्शक असे एकूण ६९ जण सहभागी झाले.

कार्यशाळेत विद्यापीठाचे प्र. कुलगुरु प्रा. जोगेंद्रसिंग बिसेन यांनी 'विकसित भारत २०४७ मध्ये विद्यापीठांची भूमिका' या विषयी प्रमुख मार्गदर्शन केले. विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालक डॉ. संजीवनी महाले यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीम. स्नेहल मांजरेकर यांनी या कार्यशाळेचे समन्वयन केले. तसेच एम.ए. शिक्षणशास्त्र संरचना आणि मूल्यमापन (प्रा. संजीवनी महाले), संशोधन कार्यासाठी विविध संस्थांकडून मिळणारे अनुदान (प्रा. व्ही. बी. गायकवाड), संशोधन कार्याच्या विविध स्रोतांचे उपयोजन (डॉ. प्रकाश बर्वे), संशोधन कार्य कृती सत्र ३ व सत्र ४ (श्रीम. स्नेहल मांजरेकर), संशोधन लेख / शोधनिबंध विकसन आणि चा वापर (डॉ. राजकुमार ननवरे), अध्यापनाविषयक क्षेत्रीय कार्य आणि आंतरवासिता कार्यवाही (डॉ. सुभाष सोनुने), समंत्रक संकल्पना व समंत्रक प्रतिमाने परिचय (डॉ. दयाराम पवार), संपर्कसत्र कार्यवाही (श्रीमती वर्षा बहिरम), प्राश्निक परीक्षक समीक्षक कार्य (प्रा. सज्जन थूल), परीक्षा पद्धत (डॉ. चंद्रकांत पवार) याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. प्रश्नोत्तरे व खुली चर्चा करण्यात येवून उपस्थितांचे शंका निरसन करण्यात आले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी सचिन सूर्यवंशी, विजय अहिरराव, प्रशांत गायकवाड, सचिन कटारे, रवींद्र सोनवणे, प्रदीप शिंदे यांनी सहकार्य केले.

# मतदानासाठी निलंग्यात आलेले नागरिक शहराकडे परतले; उमेदवारांना पुन्हा करावी लागेल त्या मतदारांची मनधरणी

**निलंगा/आयुब बागवानः** प्रचाराची रणधुमाळी संपून प्रत्यक्षात मतदानासाठी कांही तास शिलक असताना अचानक निवडणूक आयोगाने निवडणूक स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केल्याने सर्वच राजकीय पक्ष व उमेदवारांना मोठा धक्का बसला. या प्रचारासाठी त्यांनी घेतलेले सारे कष्ट वाया गेले. मतदान करण्यासाठी निलंग्यात दाखल झालेले जवळपास दोन हजार मतदारांना रिटर्न तिकीट काढून परत जावे लागले आहे.

राजकीय दृष्टया लक्षवेधी असलेल्या निलंगा नगरपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम दि. ४ नोव्हेंबर रोजी जाहीर झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सर्वच उमेदवारांनी आपली ताकद आजमावत ही निवडणूक प्रतिष्ठेची करत निवडणूक प्रचारात स्वतः ला झोकून दिले होते. भाजपकडून माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, युवानेते अरविंद पाटील निलंगेकर, काँग्रेसकडून जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी सभा, कॉर्नर बैठका, रॅलीच्या माध्यमातून प्रचाराचा धुरळा उडाला होता. व काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे हमीद शेख भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजयराज हलगरकर,यांनी प्रचाराचे रान उठवले होते. यामुळे शहरातील निवडणूक काँग्रेस विरुद्ध भाजप ही रंगी लढत निर्माण झाली होती. तसेच शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने स्वतः लिंबन महाराज रेशमे घर टू घर भेटी देऊन आपली मशाल तेवत ठेवली होती.

या शिवसेनेच्या मशालीची झळ कोणाला बसणार अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मुजीब सौदागर, राष्ट्रवादीकडून ॲड. अखिल देशमुख अपक्ष म्हणून महमद पठाण यांनी डोक्यावर छत्री घेत शहर भरातून मिरवणूक काढून आपले लक्षवेधत आपले नशीब आजमावण्यासाठी जोरदार प्रचार करताना दिसले. आपणच कसा शहराचा विकास करु शकतो हे मतदारांना घरोघरी जाऊन उमेदवार पटवून सांगत होते. प्रचाराच्या निमित्ताने शहरातील मजूर वर्गाच्या हाताला कामही मिळाले होते. शेवटच्या दिवशी मोठ्या प्रमाणात मतदारांना लक्ष्मी दर्शनही झाल्याची चर्चा आहे. जास्तीत जास्त मतदान आपल्या पारड्यात पाडण्यासाठी बाहेर गावी असलेल्या मतदारांची तिकीटे देण्यात आल्याची चर्चा आहे

जवळपास २ हजाराच्या घरात मतदार निलंग्यात दाखल झाले होते. कांही जण प्रवासात असताना मतदानाच्या पूर्व संध्येला निवडणूक आयोगाने निवडणूक स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केल्याने मोठ्या शहरातून गावाकडे येणाऱ्या उमेदवारांना मात्र अडचण निर्माण झाली. ज्या उल्हासाने ते गावाकडे येत होते त्या मतदारांचा मात्र भ्रमनिराशा झाली. आता शहराकडे परत गेलेल्या उमेदवारांना पुन्हा मतदानासाठी गावाकडे बोलविण्यासाठी त्या मतदाराची पुन्हा उमेदवारांना मनधरणी करावी लागणार आहे. अचानक निवडणूक स्थगित केल्याने अनेक उमेदवारांना अश्रू अनावर झाले तर पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठा हिरमोड झाला, काँग्रेस, वंचित,



शिवसेनेने रस्त्यावर उतरून निषेध व्यक्त केला. राजकीय पक्ष खर्च करतील पण गरीब उमेदवारांनी परत खर्च कोठून करावा असा सूर ऐकायला मिळाला, प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांची उमेदवार पदाधिकारी व कार्यकत्यांची समजूत काढत या घटनेकडे संधी म्हणून बघा, प्रचारात ज्या ठिकाणी पोहचता

आले नाही, अशा ठिकाणच्या मतदारांशी चर्चा करा, अशा सूचना उमेदवारांना दिल्या आहेत. पुन्हा जोमाने काम करु आणि जिंकू असा संदेश त्यांना देण्यात आला. दि. ४ डिसेंबर रोजी नविन कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर करत दि. १० डिसेंबरपर्यंत नगराध्यक्ष, प्रभाग ८ मधील अ व प्रभाग ९ मधील अ जागेवर नामनिर्देशन पत्र परत घेण्याची मुदत देण्यात आली आहे व दि २० डिसेंबर रोजी मतदान आणि २१ डिसेंबर रोजी निकाल असा कार्यक्रम जाहीर केला आहे. दोन दिवसापासून थंडावलेला प्रचार दि. ११ डिसेंबरनंतर पुन्हा सुरू होणार आहे. पुन्हा एकदा राजकीय पक्षांच्या नेत्यांना, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना जोर काढावा लागणार आहे....

## माजी मंत्री आ.अमित देशमुख यांनी साधला बाभळगाव निवासस्थानी नागरिकांशी संवाद



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि.०५ डिसेंबर रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्थाचे पदाधिकारी,काँग्रेस पक्ष पदाधिकारी,कार्यकर्ते, नागरिक महिला भगिनी यांच्या भेटी घेत त्यांच्या अडीअडचणी तसेच समस्या समजून घेतल्या. यासोबतच निवेदन व निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमीटिचे अध्यक्ष- ॲड.किरण जाधव,विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन ॲड.समद पटेल,लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती-ललितभाई शहा,माजी उपसभापती-मनोज पाटील,ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख,लातूर तालुका काँग्रेस

कमिटी अध्यक्ष- उमेश बेद्रे, कृष्णा बांगड, सुपर्ण जगताप,रवींद्र डोंगरे,गोविंद देशमुख,जहीर शेख, दगडूआप्पा मिटकरी,रमाकांत गडदे,हनमंत पवार, अविनाश देशमुख,अनिल पाटील,रमेश आडसकर, प्रवीण सूर्यवंशी,अनिल पुरी,गौस शेख,दिलीप गायकवाड,सिकंदर पटेल,लायक पटेल,राजकुमार कत्ते,ॲड.गणेश कांबळे,वसंत कदम,रमेश सूर्यवंशी, बालाप्रसाद बिदादा,निरज गोजमगुंडे,सारिका वरणकर,मुनवर शेख,इम्रान सय्यद,पप्पू देशमुख, गोविंद पवार,नानाराव भोसले,बाबा आवटे,विजय वाघमारे,विशाल काणेकर,रेखा सूर्यवंशी,ॲड. शुभदा पोतदार,सचिन शिंदे,विष्णू सावंत,महेश बरगले, लक्ष्मण पवार,प्रमोद लांडगे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी,कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

## जन्म-मृत्यू नोंदणी विकेंद्रीकरणाला आरोग्य विभागाची मंजुरी

### लातूर शहर काँग्रेस कमिटीच्या मागणीला यश!



### मागणीला तात्काळ मंजुरी: नागरिकांची गैरसोय टळली

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने (राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग) तातडीने याची दखल घेऊन उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर यांना यासंदर्भात पत्र काढले आहे. या पत्रानुसार, लातूर शहरात जन्म-मृत्यू नोंदणीचे काम पूर्वीप्रमाणेच महानगरपालिकेच्या संबंधित उप-निरीक्षक, जन्म-मृत्यू यांच्या नियंत्रणाखाली व त्यांच्या कार्यालयाअंतर्गत चालवण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे आता प्रत्येक झोनमध्ये हे कार्यालय कार्यान्वित होण्याची प्रक्रिया सुरू होईल. लातूर शहर काँग्रेस कमिटीच्या प्रयत्नांमुळे नागरिकांची होणारी गैरसोय टळली असून, त्यांना प्रशासकीय कामासाठी होणारा त्रास कमी होणार आहे. काँग्रेस कमिटीने घेतलेल्या या पुढाकारामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने जिल्हाध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने लातूर महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे जन्म व मृत्यू नोंदणी कार्यालयाच्या विकेंद्रीकरणाची जी मागणी केली होती, ती आता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने मान्य केली आहे. यामुळे शहराच्या नागरिकांना जन्म व मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्याच्या प्रक्रियेत होणारा नाहक त्रास वाचणार असून, मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. काँग्रेस कमिटीच्या वतीने आयुक्तांकडे केलेल्या मागणीत उल्लेख करण्यात आला होता की, सध्या असलेले जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालय एकाच ठिकाणी कार्यरत असल्याने त्यावर कामाचा मोठा ताण येत आहे. केवळ एकाच मुख्य कार्यालयावर संपूर्ण शहराची जबाबदारी असल्याने, प्रमाणपत्र मिळवण्यासाठी नागरिकांची प्रचंड गर्दी होते. परिणामी, नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो, तसेच लांबून यावे लागत असल्याने वेळ आणि श्रम वाया जातात. या समस्येवर तोडगा म्हणून काँग्रेस कमिटीने अशी मागणी केली होती की, हे कार्यालय प्रत्येक झोनमध्ये सुरू करून त्याचे विकेंद्रीकरण करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांना त्यांच्या घराजवळच्या झोन कार्यालयात हे प्रमाणपत्र सहज उपलब्ध होईल आणि नागरिकांची गैरसोय टळेल. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून लातूर महानगरपालिकेने तात्काळ या पत्राची दखल घेऊन अंमलबजावणी करावी अशी मागणी केली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार-एक चिंतन


खरंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाला असंख्य असे पैलू आहेत. त्यातील एक पैलू म्हणजे ते अर्थशास्त्रज्ञ होते. बॅरिस्टर सारखी पदवी आणि इतर काही पदव्या सोडल्या तर जास्तीत जास्त पदव्या या अर्थशास्त्रातून त्यांनी मिळवल्याचे दिसून येते. डॉ.आंबेडकर हे सीडनहॅम महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून देखील काही काळ कार्यरत होते. १९१५ साली अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून एम.ए.ची पदवी पूर्ण केली. तेव्हा एम ए चा विषय देखील अर्थशास्त्र हाच होता. त्याच विद्यापीठातून पीएच.डी. आणि इंग्लंड मधून लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या विद्यापीठातून डी.एस्सी पदवी पूर्ण केली.डी.एस्सी आणि बॅरिस्टर एॅट लॉ या दोन पदव्या एकाच वेळी त्यांनी पूर्ण केलेल्या आहेत. जगातील सर्वश्रेष्ठ विद्यापीठातून सर्वाधिक अर्थशास्त्र या विषयांमध्ये पदव्या प्राप्त केलेली एकमेव व्यक्ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होय.



बऱ्याचदा आपणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ होते हे माहित नाही. त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये भरीव असे योगदान दिलेले आहे. आणि हे योगदान देत असताना त्यांनी सर्व सामान्य माणूस समोर ठेवून त्याच्या कल्याणाचा विचार केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तीन प्रमुख ग्रंथाचे लेखन केल्याचे दिसून येते. १९२३ नंतर त्यांनी फारसा लिखाणावर भर न देता वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये योगदान दिलेले आहे.

याचा आपण विचार केल्यास प्रत्येक कामामध्ये अर्थशास्त्र या विषयाची प्रचिती आल्याचे आपणाला दिसून येते. एम ए च्या पदवीचा अभ्यास करताना त्यांनी ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी या विषयावर ४२ पानांचा प्रबंध सादर केला. त्याचबरोबर द इव्हल्युशन ऑफ प्रवेन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया हा त्यांचा पीएच.डी चा प्रबंध होता. तो प्रबंध पुस्तक रूपाने आलेला आहे.त्याचबरोबर डी.एस्सी या पदवीसाठी द प्रॉब्लेम ऑफ रुपीज इट्स ओरिजीन अँड इटस् सोल्युशन हा विषय घेऊन त्यांनी संशोधन केले.

पीएच.डी साठी त्यांनी .१८८० ते १९२० या कालखंडातील ब्रिटिश केंद्र सरकार आणि त्यावेळचे ब्रिटिश राज्य सरकार , या दोन्ही मधील संबंध कसे आहेत?आणि ते कसे असले पाहिजेत याबाबतचे महत्त्वपूर्ण संशोधन त्यांनी केलेले आहे. वित्त आयोग दर पाच वर्षांनी नेमला जातो.त्याचा अहवाल सादर केला जातो.या वित्त आयोगासाठी आधारभूत ग्रंथ म्हणजे त्यांचा पीएच.डी चा प्रबंध होय. रुपयाची समस्या या ग्रंथाबाबत बोलायचे झाल्यास विनिमयाचे साधन, त्याची उत्क्रांती , भारतासारख्या विकसनशील देशासाठी आदर्श चलन पद्धती कोणती आहे? याबाबत सखोल मार्गदर्शन केलेले आहे. चलन पद्धतीच्या बाबतीमध्ये जे एम केन्स यांनी वित्त व्यवस्थेवर लिहिलेल्या ग्रंथाचे खंडन करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. केन्सच्या म्हणण्याप्रमाणे सुवर्ण विनिमय परिमाण हे लवचिक आहे आणि ते भारतासाठी आदर्श चलन पद्धती ठरेल असे केन्सचे मत होते. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याला विरोध केला. आणि लवचिकता हे दुधारी अस्त्र आहे. ते चांगले आणि वाईट देखील असू शकते असे त्यांचे मत होते. जर अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी जर या पद्धतीचा वापर केला तर सुवर्ण विनिमय परिमाण उपयुक्त ठरेल.परंतु जर सरकार बेजबाबदार असेल तर त्या लवचिकतेचा दुष्परिणाम होऊ शकतो.आणि चलनाची अनियंत्रित निर्मिती होऊन पैशाचा पुरवठा होईल.परिणामी महागाई वाढेल , त्याचा परिणाम म्हणून सर्वसामान्य व्यक्तीचे महागाईमुळे कंबरडे मोडेल. त्यांचे आर्थिक कल्याण साध्य होणार नाही. यासाठी केन्स च्या विचारांना त्यांनी विरोध केल्याचे दिसते. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पद्धती ला विरोध केला. त्याचबरोबर त्या काळात बॉम्बे मनी लेंडर्स साठी पासबुक असावे अशा प्रकारचे त्यांनी विचार मांडले. जेणेकरून कर्ज घेण्यासाठी पासबुक असेल तर कर्ज घेणाऱ्या व्यक्तीची आर्थिक पिळवणूक होणार नाही असे डॉ.बाबासाहेबांचे विचार होते. १९३६ आली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला आणि कामगारांना संरक्षण मिळवून दिले. १९३९ मध्ये मुंबई प्रांतात संप झाला तेव्हा सरकारने संप करण्याचा अधिकार काढून घेतला होता तेव्हा डॉ.बाबासाहेबांनी त्याला प्रखर विरोध करून तो काळा कायदा बंद करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्रीय विचार मांडत असताना तळागाळातील सर्वसामान्य व्यक्तीचा विचार करून त्यांचे आर्थिक कल्याण, सामाजिक कल्याण कसे साध्य होईल याचा विचार समोर ठेवलेला आपणाला दिसून येतो. १९४२ मध्ये जेव्हा ते मजूर मंत्री म्हणून कार्य करत होते तेव्हा त्यांनी कौशल्य विकास आणि एम्प्लॉयमेंट एक्सचेंज यावर भर दिला. त्याचबरोबर शेतीचे आकारमान लहान असल्यास शेतीची उत्पादकता कमी असते.त्यामुळे सामूहिक पद्धतीची शेती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे अशा प्रकारचे विचार त्यांनी मांडल्याचे दिसते.देशाचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर उद्योग क्षेत्राचा विकास झाला पाहिजे. उद्योग क्षेत्रामध्ये नवनवीन यंत्र सामग्रीचा देखील वापर झाला पाहिजे. परंतु हा वापर होत असताना संपत्तीचे केंद्रीकरण होऊ नये, त्याला आळा बसावा मक्तेदारी ला आळा बसावा असे बाबासाहेबांचे मत होते. राज्य समाजवाद यावर विचार मांडताना त्यांना भांडवलशाही आणि समाजवादी या दोन्ही प्रकारची अर्थव्यवस्था मान्य नव्हती.तर मिश्र अर्थव्यवस्था हा त्यांच्या आर्थिक रचनेचा एक पाया आहे असे म्हणावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्रीय विचार मांडत असताना संपत्ती व आर्थिक संबंध याबरोबरच कल्याणावर अधिक भर दिल्याचे दिसून येते.



**प्रा.डॉ.मारुती अभिमान लोंढे**
**(अर्थशास्त्र विभाग प्रमुख, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,धाराशिव)**

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अतिक्रमण मुक्त व परिसर स्वच्छतेसाठी निवेदन



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- शुक्रवार दिनांक ५ डिसेंबर रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्यावतीने धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे असलेल्या विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरातील बरेच अनधिकृत अतिक्रमण वाढलेले आहे.फळांचे गाडे,खाद्यपदार्थाचे स्टॉल, प्रवासी रिक्षा वाहने व कचरा टाकण्यामुळे या परिसरात अस्वच्छता दुर्गंधी व वाहतुकीची खूप मोठी समस्या निर्माण झालेली आहे.याच परिसरात वर्दळीच्या गर्दीमुळे मद्यप्राशन केलेले काही लोक लघुशंका व घाण करण्याच्या घटना सतत घडत आहेत.याच परिसरात बहुसंख्य डिजिटल बोर्ड लावले जातात. यामुळे पुतळा परिसराचे सौंदर्य नाहीसे होत आहे. शिवरायांच्या पुतळ्याचा बहुतांशी भाग साफसफाई विना राहत आहे. या सर्व घटकांमुळे समस्त धाराशिवकर शिवभक्तांच्या भावना अत्यंत तीव्र झालेल्या आहेत.या सर्व गोष्टींना पायबंद घालण्यासाठी व साफसफाईसाठी २४ तास नगर परिषदेचे दोन कर्मचारी नियुक्त करावे,पुतळा परिसरातील अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे,पुतळा परिसराचे रुंदीकरण करण्यात यावे, पुतळा परिसरात डिजिटल बोर्ड लावण्यास बंदी घालण्यात यावी, पुतळ्याच्या पावित्र्यासाठी व संरक्षणासाठी आपल्या शासकीय स्तरावरून पोलीस विभागाशी पत्रव्यवहार करून २४ तास पोलिसांची नियुक्ती करण्यात यावी. शिवछत्रपतींचा पुतळा व परिसरात काही अघटीत दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील.वरील मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास समितीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी अशा प्रकारचे निवेदन मा.मुख्याधिकारी मॅडम नगरपरिषद धाराशिव यांना देण्यात आले.

यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे उपाध्यक्ष श्री हनुमंत यादव, सचिव श्री आकाश भोसले, शहराध्यक्ष श्री संतोष घोरपडे, श्री हनुमंत तांबे, श्री व्यंकटेश पडिले, श्री अमोल साळुंके,श्री रामानंद माडेकर, विशाल पवार, बालाजी क्षीरसागर, श्री योगेश आतकरे,अड. श्री जयप्रकाश साळुंके ई. सह समितीचे आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जगाच्या उद्धारासाठीच परमेश्वराचा अवतार - हभप बोधले महाराज

## धाराशिव येथे श्री दत्त जन्मोत्सव अखंड दत्तनाम सप्ताह सोहळ्याची काल्याचे कीर्तन, महाप्रसादाने सांगता भव्य ग्रंथराज गुरचरित्र ग्रंथदिंडीने वेधले लक्ष टाळ, मृदंगाच्या गजरात बालवाकऱ्यांचे उत्कृष्ट सादरीकरण

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-जगाच्या उद्धारासाठीच परमेश्वराने अवतार घेतला. सत्य, धर्म रक्षणासाठी परमेश्वर अवतार घेत असतो असे प्रतिपादन भागवताचार्य हभप अमोल बोधले महाराज यांनी केले.

त्रैलोक्याचे स्वामी प.पू. श्री गुरूदेव दत्तात्रेय महाराज यांच्या जन्मोत्सवनिमित्त पिताश्री श्रीमंतराव (आबा) रणदिवे प्रतिष्ठानच्या वतीने धाराशिव येथील शांतीनिकेतन कॉलनी येथे आयोजित गुरूचरित्र पारायण, भजन, कीर्तन, अखंड दत्तनाम सप्ताह सोहळ्याची गुरूवारी (दि.४) काल्याचे कीर्तन व महाप्रसाद वाटपाने उत्साहात सांगता करण्यात आली. यावेळी भागवताचार्य हभप बोधले महाराज यांनी धरी अवतार विश्व तारायवया.. या अभंगावर निरूपण करून कीर्तन केले. गवळणी गात प्रभूंच्या लहानपणींच्या लिलांची माहिती सांगितली. यावेळी हभप बोधले महाराज यांच्या हस्ते काल्याची हंडी फोडण्यात आली. श्री दत्तगुरूंचे आरती-पूजन करून भाविकांना काला व महाप्रसाद वाटप करण्यात आला. सकाळी श्री दत्तगुरूंच्या पादुकांचा महाभिषेक करण्यात आला. श्री गुरूचरित्र ग्रंथदिंडी काढण्यात आली. या मिरवणुकीत तेर येथील संत गोरोबाकाका वारकरी शिक्षण संस्था व मेडसिंगा येथील रावसाहेब बाबा पाटील महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या बालवारकऱ्यांनी टाळ- मृदंगाच्या गजरात ठेका धरून उत्कृष्ट सादरीकरण केले. ठिकठिकाणी पालखीच्या स्वागतासाठी भाविक महिलांनी आकर्षक रांगोळी रेखाटली होती. भाविकांनी या मिवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. सप्ताह सोहळ्यानिमित्त २७ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत गुरचरित्र पारायण, महिला भजनी मंडळाची भजन सेवा, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. या सप्ताह सोहळ्यास प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय रणदिवे, राजाभाऊ नाईकनवरे, लक्ष्मीकांत जाधव, प्रभाकर चोराखळीकर यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसंबंधी मोठे विसंगत चित्र समोर आले-खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव(अंजुम शेख)- शेतकरी मदतीच्या प्रश्नावर केंद्र-राज्य सरकारच्या परस्परविरोधी वक्तव्यांनी निर्माण झालेल्या गोंधळावर खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर (ओमराजे) यांनी संसदेतील लक्ष वेधत सरकारवर थेट निशाणा साधला आहे. लोकप्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना जर मंत्री माहिती देत असतील, तर त्यांच्यावर हक्कभंगाची कारवाई व्हायलाच हवी, अशी ठाम मागणी त्यांनी संसदेत केली.

ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभेत उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नांमधून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसंबंधी मोठे विसंगत चित्र समोर आले. राज्य सरकार सांगत असताना - आम्ही केंद्राकडे मदतीचा प्रस्ताव पाठवला आहे, - तर केंद्र सरकारचे जबाबदार मंत्री याच्या उलट सांगत आहेत - राज्याकडून कोणतेही औपचारिक निवेदन आलेले नाही.

या परस्परविरोधी दाव्यांवर संताप व्यक्त करत खासदार निंबाळकर म्हणाले, शेतकऱ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, हजारो हेक्टर पिकांचा नाश झाला, राज्य-केंद्र एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत आणि यामध्ये पीडित शेतकरी मात्र तिढ्यात अडकला आहे.

केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये २६ नोव्हेंबरपर्यंत राज्यातील तब्बल ७५.४२ लाख हेक्टर क्षेत्रातील पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. तसेच २२४ नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहितीही त्यांनी दिली. केंद्राने ३ ते ५ नोव्हेंबर दरम्यान नुकसानीची पाहणी करण्यासाठी पथक पाठवले होते; तरीही मदतीसाठी राज्याकडून प्रस्ताव मिळालेला नाही, असा दावा केंद्राने आपल्या उत्तरात नोंदवला.

राज्य सरकारवरही टीका करत खासदार निंबाळकर म्हणाले की, अकाड्याचा खेळ करून राज्याने शेतकऱ्यांच्या हातात काहीही दिले नाही. राज्यावरचा विश्वास उडाला म्हणून शेतकऱ्यांची शेवटची आशा केंद्र सरकार होती; पण त्यांनीही वेळकाढूपणा करत शेतकऱ्यांच्या वेदनांची थट्टा केली.

शेतकऱ्यांना तातडीची आणि पुरेशी मदत देण्यासाठी केंद्राने त्वरित निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सरकारकडे केली आहे.

# कडाक्याच्या थंडीतही पहाटेपासूनच ऊसतोड मजुरांची धडपड



गुंजोटी (प्रतिनिधी)- उमरगा तालुक्यातील गुंजोटीसह परिसरात सध्या कडाक्याची थंडी असली तरी ऊसतोड मजुरांचा दिवस मात्र पहाटेच सुरू होतो. गावात अजून अंधार असतो. पण ऊसतोड मजूर मात्र उठून तयार झालेले असतात. घड्याळाचे काटे तीन किंवा साडे तीन दाखवत असतात. आणि ते थेट उसाच्या फडाकडे निघतात. कारण त्यांच्या जगण्यात थंडीपेक्षा पोटाचे महत्त्व जास्त आहे. थंडी कितीही असेना त्यांचा कोयता मात्र थांबत नाही. पहाटे चार वाजता उसाच्या फडात इतकी थंडी असते की हात पाय गोठून जातात. उसाच्या पानावर दव जमा झालेले असते. गारवा पसरलेला असतो अशावेळी कोयता हातात घेऊन काम करणे खूप अवघड असते. ना हातमोजे ना अंगावर उबदार कपडे, कोणी फाटका स्वेटर, कोणी शाल गुंडाळून काम सुरू करतात. पण हवेतील थंडी लगेचच अंगात शिरते. हात बधिर होतात पाय सुन्न होतात तरीही ते ऊस तोडत राहतात कारण थांबले तर दिवसाची मजुरी कमी होते. ऊसतोड मजूर हे साखर उद्योगाचा खरा कणा ऊसतोड मजूर हे साखर उद्योगाचे खऱ्या अर्थाने कणा आहेत पण त्यांच्या श्रमाचे मोल मात्र योग्य प्रमाणात वाढत नाही. थंडीत उन्हात पावसात ते कोयता चालवून लाखो टन ऊस कारखान्यात पोहोचवतात तरीही त्यांना मूलभूत सुविधा मिळत नाही. मजूर सहा ते आठ महिने गावापासून दूर असतात. तंबू किंवा शेडमध्ये राहावे लागते. साखर उद्योगाला लाभ मजूर मात्र वंचितच साखर कारखाने मोठा नफा कमवतात शेतकऱ्यांचेही उत्पादन चांगलं असल्यास त्यांना फायदा होतो पण मजुरांचे प्रश्न वर्षानुवर्षे तसेच आहेत त्या मजुरांना साधा हात मोजा, जाड शाल किंवा गरम पाणीही कोणी देत नाही. दुर्घटना झाल्यास तातडीची मदत ही मिळत नसते. कामगारांसोबत त्यांच्या लेकरा-बाळांचीही आबाळ ऊसतोड कामगारांमध्ये महिलांची संख्याही मोठी असते. त्या पुरुषासारखंच कोयता चालवतात पण त्यांना घराची जबाबदारी सांभाळावी लागते. तंबूमध्ये मुलांना झोपून त्या कामाला जातात मुलांना थंडी लागते ते रडतात पण आईने थांबून काही उपयोग नसतो त्याच्या हातात रोजच काम यापेक्षा दुसरा पर्याय नसतो. लेकरा बाळांना फडात सोबत आणावे लागते तेथे त्यांचीही आबाळ होते. सहा महिने त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे नुकसान होते. पहाटे तीन पासून दिनक्रम : पहाटे तीन वाजता उठतात. थंड पाण्याने चेहरा धुवावा लागतो. गरम चहा किंवा नाश्त्याची सोय नसते भाकरीचा तुकडा कधी पोळीचा तुकडा खाऊन ते कामाला निघतात. त्यांच्या पायात अनेकदा जुन्या किंवा फाटके चप्पल असतात. दव बिंदूंनी ओले झालेल्या शेतातून चालताना पाय भिजतात थंडी अजून वाढते सूर्य उगवला की थंडी कमी होते तरीही काम थांबत नाही उजेड पडला की उसाच्या मुळ्या बांधण्याची गती वाढते ट्रकवर ऊस चढवणे मोजणी करणे पुढच्या जागी जाणे हा सगळा प्रवास अखंड सुरू असतो. गुंजोटी परिसरातील शिवारात पहाटेच्या सत्रात ऊसतोड कामगार ऊसतोड करताना दिसत आहेत.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**


# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)-येरमाळा पोलीस ठाणे अंतर्गत-अमर रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०४.१२.२०२५ रोजी १४.५० वा. सु. आपल्या ताब्यातील पे रिक्षा क्र एमएच २५ एके२०१७ हा येरमाळा बसस्थानकाचे समोर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना येरमाळा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये येरमाळा पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

तसेच मुरुम पोलीस ठाणेअंतर्गत बिभिषण रा. कोथळी ता. उमरगा जि. धाराशिव,मशाक महेबुब पिंजार, वय ३० वर्षे, रा. आलुर ता.उमरगा जि. धाराशिव यांनी दि.०४.१२.२०२५ रोजी १४.२५ वा. सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे पे रिक्षा क्र एमएच २५ एफ०९७४ व पे रिक्षा क्र एमएच २० ए.जी ८१९३ हे बस स्थानक मुरुम येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना मुरुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये मुरुम पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

# धाराशिवातून मोटारसायकलची चोरी गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सज्जन श्रीराम मते, वय २६ वर्षे, रा. दहिफळ ता. कळंब जि धाराशिव ह.मु. हॉटेल किग्र एम आय डी सी धाराशिव यांची अंदाजे ३०,०००किंमतीची मोटरसायकल ही हॉटेल किग्र च्या जिन्याजवळ एम आय डी सी धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सज्जन मते यांनी दि.०४.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **INAMDAR MEHRUNISA BEGAM MANSOOR ALI**
TO: **MEHARUNNISA BEGAM MANSUR ALLI INAMDAR**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **INAMDAR MEHRUNISA BEGAM MANSOOR ALI** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **INAMDAR MEHRUNISA BEGAM MANSOOR ALI INAMDAR**
NEW NAME :- **MEHARUNNISA BEGAM MANSUR ALLI INAMDAR**
Address - Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar No.-721778254420Mob.9422655654

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **DEEPAK SOMNATH MUNDHE**
TO: **DEEPAK SOMNATH MUNDE**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **DEEPAK SOMNATH MUNDE** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **DEEPAK SOMNATH MUNDHE**
NEW NAME :- **DEEPAK SOMNATH MUNDE**
Address - Bombale Hanuman Chowk, Pivali Taki, Dharashiv Tal And DIST. Dharashiv 413501
Adhar No.-429907345879 Mob.9923902555


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६१२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649